इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १२
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. २५/०३/२०२६, २७/०३/२०२६, इ. रोजी झालेल्या मा. महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

मागील सभा दि. २५/०३/२०२६, २७/०३/२०२६, इ. रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : R.A.Sut.. सौ. ढ. अ. सातपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १३
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २ : इंदौर शहर स्वच्छता धर्तीवर इचलकरंजी शहर स्वच्छ ठेवणेकामी महापालिकेमार्फत कार्यवाही सुरु करणेकरीता निर्णय घेणेबाबत मा. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. ०२/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत.

**ठराव**

संदर्भीय विषयास अनुसरून इंदौर शहराच्या धर्तीवर इचलकरंजी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही सुरु करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.इंदौर शहाराने घनकचरा व्यवस्थापन, दैनंदिन कचरा संकलन,ओला-सुका कचरा वर्गीकरण, प्रक्रिया व पुर्नवापर या बाबतीत देशात आदर्श निर्माण केला आहे. त्याच धर्तीवर इचलकरंजी शहरातही उपाय योजना राबवणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने घनकचरा प्रक्रिया केंद्रामध्ये ओल्या कचऱ्यातून तयार होणाऱ्या लिचेट (द्रव स्वरुपाचा कचरा) निचऱ्यासाठी गटर व पीट चेंबर तयार करणे, मृत जनावरांच्या शरीराच्या विल्हेवाटीसाठी विदयुत दाहिणी उभारणे, उद्यानातील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे साठी श्रेडींग मशिन खरेदी करून नाडेप पीट तयार करणे व त्यासाठी शेडची उभारणी करणे तसेच R.R.R. ( Reduce, Reuse, Recycle) सेंटर तयार करणे इ. कामे प्रस्तावित असून या उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

मा.सभागृह नेते यांच्या मागणीनुसार इचलकरंजी शहर स्वच्छता सुधारण्यासाठी आवश्यक कार्यवाही बाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. यावेळी अनेक सदस्यांनी विविध सूचना मांडल्या. या सर्वांचा विचार करुन शहरातील घनकचऱ्याचे संकलन, वाहतुक, प्रक्रीया तसेच शहर स्वच्छतेसंबंधी कार्यवाही करणेसाठी महापालिका अधिनियमाचे तरतुदीनुसार नियम (अनुसुचीत फेरफार करणे व तीत भर घालणे) करणे करीता आवश्यक फेरफार करणेसाठी अभ्यास करुन शिफारस करणेकरीता सभागृह नेता, विठ्ठल चोपडे व इतर सदस्यांची समिती नेमणेत यावी. समिती सदस्य निवड करणेचे अधिकार मा. महापौर यांना देणेत येत आहेत.

सूचक : Satish स. व. मुळीक.

अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १४
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. ३ : विलास किसन सोनुले (मांग) व महादेव शेशाप्पा पवते (आवटे) यांना सफाई कामगार म्हणुन सेवेत घेणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर घेणेबाबत मा. उदय आनंदा धातुंडे, महापौर यांनी दि. ०६/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

**ठराव**

१. उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील, श्री.विलास किसन मांग (सोनुले) व श्री.महादेव शेशापा पवते (आवटे) यांचे दोन स्वतंत्र अर्ज Ref.1 वर सादर केले आहेत. मा.उच्च न्यायालय यांचे आदेशांप्रमाणे (तत्कालीन) नगरपालिकेने केलेल्या बदली कामगार यादीत अ.क्र. ४६० वर श्री.विलास मांग (सोनुले) यांचे आणि अ.क्र.४६८ वर श्री.महादेव पवते (आवटे) यांचे नाव आहे. रिट पिटीशन नं.११६३/९४ मधील दि.१४.०६.१९९४ चे आदेशाप्रमाणे व दिनांक ०६.०४.१९९९ चे मिनिट्स ऑफ ऑर्डरप्रमाणे बदली कामगारांचे नेमणूक केलेचे आदेश काढण्यात आले होते. नावांत बदल असलेने तसे ॲफिडेव्हीट दाखल करण्यात आले आहे. संबंधितांनी सादर केलेले कागदपत्र व तत्कालिन लिगल ॲडव्हायजर यांचे अभिप्रायाप्रमाणे (१) श्री.महादेव शशी पवते (आवटे) व (२) विलास किसन मांग (सोनुले) यांचेकडून बंधपत्र लिहून घेवून नगरपालिकेकडे रिकाम्या असलेल्या सफाई कामगार जागी नियमाप्रमाणे नेमणूक करणेस मंजुरी देणेत येत आहे, असा ठराव विषय क्र.१४, दिनांक २६.०४.२००५ ने झाला आहे. त्यानुसार कामावर हजर करून घेण्याची विनंती अर्जदार सोनुले व पवते यांनी केली आहे.

२. सदरबाबत मा. महापौर यांनी दिलेले संदर्भ क्र. २ वरील पत्र Ref.2 वर जोडले आहे. वरील संबंधित श्री. सोनुले व श्री.पवते यांना हजर करून घेणेबाबत ठराव दिनांक २६.०४.२००५ चा झाला असल्याचे, मात्र त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे नमूद करून हा विषय येणाऱ्या मा. महासभेच्या अजेंड्यावर घेणेबाबत मा. महापौर यांनी प्र.नगरसचिव यांना निर्देश दिले आहेत, तसेच यासंबंधी अहवाल मा. महासभेसमोर सादर करणेबाबत संबंधित विभागास अवगत करणेबाबतही प्र.नगरसचिव यांना सूचना दिला आहेत व त्यास अनुसरून नगरसचिव कार्यालयाकडून संदर्भ क्र. २ वरील पत्र या विभागास प्राप्त झाले आहे.

३. प्रकरणी, विभागाकडे उपलब्ध अभिलेखांवरून इकडील अहवाल खालीलप्रमाणे —

(अ) तत्कालीन इचलकरंजी नगरपालिकेकडे सन १९८० ते १९८७ अखेर कालावधीत आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांचे रजेच्या मुदतीत, त्यांचे जागी १५ ते ३० दिवसांकरिता बदली कामगार नियुक्त करण्यात येत होते. सन १९९४ मध्ये म्युन्सिपल वर्कर्स युनियनने बदली कामगारांना नगरपालिका सेवेत घेणेबाबत मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई-२, येथे रिट पिटीशन क्र.११६३/१९९४ दाखल केले. त्यामध्ये दिनांक १४.०६.१९९४ रोजी अंतरिम आदेश Ref.3 होवून त्यानुसार चतुर्थ श्रेणी (सफाई कामगार) यांची सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यात आली. सदर यादी, हरकती /सूचना /मुद्दे मागवून अंतिम करणेसाठी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेकामी मान्यतेस्तव सादर टिपणीवर मा.अध्यक्ष यांचे दि.१५.१०.१९९४ चे आदेशानुसार (Ref.4) दिनांक १६.१०.१९९४ चे दैनिक मँचेस्टर या वृत्तपत्रात प्रसिद्धीस देण्यात आली होती ( Ref.5).

(ब) उक्त यादीचे पान क्र.१५, अ.क्र.४६० वर विलास किसन मांग आणि पान क्र.१६ अ.क्र.४६८ वर महादेव शशी पवते यांची नावे समाविष्ट आहेत (Ref.6). सदर यादीतील बदली कामगारांना मा.न्यायालयाचे आदेशानुसार दिनांक २१.०१.१९९५ व त्यानंतर, (तत्कालीन) नगरपालिकेच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील, त्याप्रमाणे तात्पुरत्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले. याप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे अंतिम निर्णयास अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम देखील करण्यात आले आहे. त्यानंतर रिट पिटीशन क्र.११६३/१९९४ मध्ये यादी म्युन्सिपल वर्कर्स युनियन यांनी बदली कामगारांची यादी संपली असल्याचे मा.उच्च न्यायालयात दिलेनंतर दिनांक ०५.०२.१९९९ ला मा.न्यायलयात minutes of order (मा.न्यायाधीश आणि दोन्ही पक्षांचे वकील ज्या मुद्यांवर सहमत झाले त्याची लेखी नोंद) झालेली आहे (Ref.7). त्यानुसार बदली कामगार म्हणून काम केलेल्या कामगारांना नगरपालिका आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदांवरच नियुक्त्या दिल्या आहेत. वास्तविकत: विहित प्रक्रीयेचा (सेवायोजन कार्यालये / दुय्यम निवड मंडळे यांचेमार्फत / जाहिरातीद्वारे) अवलंब करून नगरपालिकेत केलेल्या नियुक्त्या ह्या नियमित नियुक्त्या असतात. बदली कामगारांच्या नियुक्त्या ह्या मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे / मा.न्यायालयात तडजोड करून तत्कालिन परिस्थितीत जरी केल्या असल्या तरी सदर नियुक्त्या ह्या विहित प्रक्रीयेचा (सेवायोजन कार्यालये /दुय्यम निवड मंडळे /जाहिरातीद्वारे यांचेमार्फत) अवलंब करून झालेल्या नव्हत्या ही वस्तुस्थिती आहे.

(क) प्रकरणी, Ref.6 वर सादर केलेल्या बदली कामगारांचे यादीमध्ये अ.क्र.४६० वर विलास किसन मांग आणि अ.क्र ४६८ वर महादेव शशी पवते यांची नावे समाविष्ट आहेत. अर्जदारांपैकी महादेव शेशापा पवते (आवटे) यांनी

Scanned with OKEN Scanner

तत्कालीन मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपालिका यांचेकडील दिनांक ०६.०४.१९९९ चे आदेशाची छायांकित प्रत सादर केली असून (Ref.8) त्यानुसार महादेव शशी पवते (आवटे) यांची आरोग्य विभागासाठी मंजूर असलेल्या सफाई कामगार पदावर १ वर्ष मुदतीसाठी प्रोबेशनरी स्वरुपात नेमणूक करण्यात आली आहे. तसेच त्यांनी दिनांक ०३.०४.१९९९ चे ॲफिडेव्हीट द्वारे बदली कामगार यादीतील अ.क्र.४६८ वर महादेव शशी पवते अशी चुकीची नोंद झाली असून, खरे व बरोबर नाव महादेव शेशाप्पा आवटे असल्याचे नमूद केले आहे. मात्र ते रुजू झाले नाहीत किंवा नावातील बदलामुळे त्यांना रुजू करून घेण्यात आले नसावे. मात्र रुजू करून घेण्याबाबत अर्जदारांनी कोणतेही प्रयत्न केले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्याचप्रमाणे अर्जदारांपैकी विलास किसन सोनुले (मांग) यांचेकडे विचारणा केली असता नेमणूक आदेश काढले होते, ॲफिडेव्हीट दाखल केले होते, मात्र त्याच्या प्रती गहाळ झाल्याचे सांगितले आहे. कार्यालयीन अभिलेखांतही असे अभिलेख दिसून येत नाहीत.

(ड) आता, प्रस्तुत प्रकरणांमध्ये खालील मुद्दे विचारात घेणे आवश्यक ठरते -

(i) अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेप्रमाणे दिनांक ०५.०२.१९९९ चे minutes of order प्रमाणे सन १९९९-२००० मध्ये नेमणुकीचे आदेश काढण्यात आले. यापैकी श्री.महादेव शशी पवते (आवटे) यांना आरोग्य विभागासाठी मंजूर असलेल्या विभागासाठी मंजूर असलेल्या सफाई कामगार पदावर १ वर्ष मुदतीसाठी प्रोबेशनरी स्वरुपात नेमणूक करण्यात येत असलेबाबत चे आदेश (ref.8) सादर केले आहेत, त्यामध्ये नावात बदल असलेने ॲफिडेव्हीट दाखल करण्यात आले, मात्र त्यानंतरही एप्रिल २००५ पर्यंत म्हणजेच जवळपास ०६ वर्षे कालावधीत ते रुजू झाले नाहीत. दरम्यानच्या कालावधीत विहित प्रक्रीयेचा (सेवायोजन कार्यालये /दुय्यम निवड मंडळे /जाहिरातीद्वारे यांचेमार्फत) अवलंब न करता केलेल्या अनियमित नियुक्त्या नियमित करण्याचे धोरण शासनाने सन २००३ मध्ये निश्चित केले होते. उक्त धोरणानुसार अनियमित नियुक्त्या नियमित करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना होते व आहेत. त्यामुळे सन २००५ मध्ये अर्जदार जरी नगरपालिकेत रूजू होण्यासाठी आले असते तरी त्यांना मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या मान्यतेशिवाय रूजू करून घेता आले नसते.

(ii) वरीलप्रमाणे प्रकरण दीर्घ काळ प्रलंबित राहिल्यानंतर मा.कौन्सिल सभा दिनांक २६.०४.२००५ मध्ये विषय क्र. १४ चे अनुषंगाने, "संबंधितांनी सादर केलेले कागदपत्र व रा. लिगल ॲडव्हायजर यांचे अभिप्रायाप्रमाणे (१)श्री.महादेव शशी पवते (आवटे), (२)श्री.विलास किसन मांग (सोनुले) यांचेकडून बंधपत्र लिहून घेवून नगरपालिकेकडे रिकाम्या असलेल्या सफाई कामगार जागी नियमाप्रमाणे नेमणूक करण्यास मंजुरी देणेत येत आहे." याप्रमाणे ठराव झाला असला तरी त्यानंतर आजपावेतो म्हणजेच जवळपास २१ वर्षाचा प्रदीर्घ कालावधी उलटूनही ठरावाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. सन २००५ मध्ये विहित प्रक्रीयेचा (सेवायोजन कार्यालये /दुय्यम निवड मंडळे /जाहिरातीद्वारे यांचेमार्फत) अवलंब न करता केलेल्या अनियमित नियुक्त्या नियमित करण्याचे धोरण शासनाचे धोरण अस्तित्वात होते व सदर अनियमित नियुक्त्या नियमित करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना होते. त्यामुळेच तत्कालिन कौन्सिल सभेने दिनांक २६.०४.२००५ रोजी दोन्ही कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा ठराव करून देखील त्यांना कायम करण्याची कार्यवाही संपूर्ण नगरपालिका कालावधीत म्हणजे माहे जून,२०२२ पर्यंत पूर्ण होऊ शकली नाही व आता ती पूर्ण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(iii) दरम्यानचे कालावधीत शासन अधिसूचना दिनांक २९.०६.२०२२ अन्वये तत्कालीन नगरपालिकाचे महानगरपालिकेत रुपांतर होवून इचलकरंजी महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. नवनिर्मित इचलकरंजी महानगरपालिका करिता शासनाने दिनांक ०७.०२.२०२३ चे शासन निर्णयान्वये पदांचा आकृतीबंध मंजूर केला असून त्यामध्ये अर्जदार श्री.सोनुले व श्री.पवते यांचेकरिता पदे मंजूर नाहीत. तसेच जरी महानगरपालिका अस्तित्वात असली तरी विहित प्रक्रीयेचा (सेवायोजन कार्यालये /दुय्यम निवड मंडळे /जाहिरातीद्वारे यांचेमार्फत) अवलंब न करता केलेल्या अनियमित नियुक्त्या नियमित करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभागाकडे आहेत. त्यामुळे आजरोजी देखील दोन्ही कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या (श्री.आवटे यांनी नियुक्ती आदेशाची छायांकित प्रत सादर केली आहे आणि श्री.सोनुले यांचेदेखील नियुक्ती आदेश काढण्यात आले होते असे गृहीत धरून) ह्या अनियमित नियुक्त्या असून सदर नियुक्त्या नियमित करण्याचे कोणतेही अधिकार महानगरपालिकेस नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तसेच विद्यमान महानगरपालिकेने अनियमित नियुक्त्या नियमित करण्याची कार्यवाही केल्यास सदर कार्यवाही शासनाच्या धोरणाच्या विसंगत होईल व विद्यमान महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची शासनाकडून चौकशी लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता सदर दोन्ही कर्मचाऱ्यांना विद्यमान महानगरपालिकेत रूजू करून घेण्याचा प्रश्नच येत नाही.

(iv) महानगरपालिका करिता मंजूर पदांचे सेवाप्रवेश नियम शासनाने दिनांक ०२.०५.२०२३ चे शासन निर्णयान्वये मंजूर केले असून त्यामध्ये महानगरपालिका मध्ये सेवाप्रवेशाकरिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी आहे. अर्जदार यांचे (श्री.महादेव आवटे यांचे आधार कार्ड पाहता त्यांचे जन्म वर्ष १९६१ आहे. (ref.९), याचाच अर्थ आज तारखेस त्यांचे वय ६५ वर्षे आहे, जे सेवानिवृत्तीचे कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्तीचे आहे). तसेच विलास सोनुले यांचे आधारकार्ड पाहता (ref 10) त्यांची जन्म दिनांक ०१.०६.१९६९ अशी आहे, त्यानुसार त्यांचे वय ५६ वर्षे ०९ महिने आहे). आज दिनांकाचे वय विचारात घेता तांत्रिकदृष्ट्या ते नेमणुकीस पात्र देखील ठरत नाहीत. तसेच उपरोक्त मुद्दा क्र.(१) व (२) वरून सन २००५ ते २०२२ तत्कालिन नगरपालिका कालावधीत व मुद्दा क्र.(३) वरून सन २०२२ ते २०२६ विद्यमान महानगरपालिका कालावधीत संबंधित दोन्ही

Scanned with OKEN Scanner

कर्मचाऱ्यांच्या नेमणूकी संदर्भात किंवा झालेल्या ठरावाचे अंमलबजावणीबाबत कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. तसेच आता शासनाच्या मान्यतेशिवास मा.कौन्सिलच्या ठरावाची अंमलबजावणी करत येणार नाही, किंबहुना त्याप्रमाणे अधिकार तत्कालिन नगरपालिकेस नव्हते व विद्यमान महानगरपालिकेसदेखील नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

(v) उपरोक्त मुद्दा क्र.(i) ते (iv) मधील वस्तुस्थिती विचारात घेता सदर प्रकरणाची वैधता सन २००० मध्येच संपूष्टात आली आहे. तसेच सन २००३ नंतर अनियमित नियुक्त्या नियमित करण्याचे शासनाचे धोरण अस्तित्वात आल्यामुळे व सदर धोरणानुसार विहित मुदतीत - कालावधीत कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने कायदेशीरदृष्ट्या सदर प्रकरण सद्यस्थितत व्यपगत (Lapsed) झाले आहे.

प्रकरणी अर्जदार (१) श्री.महादेव शेशापा पवते (आवटे) आणि (२) श्री.विलास किसन मांग (सोनुले) यांचे संदर्भ क्र.१ वरील अर्ज व संदर्भ क्र.२ वरील मा.महापौर यांचे निर्देश या अनुषंगाने सविस्तर अहवाल /वस्तुस्थिती तसेच (i) ते (v) मुद्दे व त्यापुष्ट्यर्थ सादर अभिलेख अवलोकनी येवून, अर्जदार यांची मागणी मान्य करता येणार नाही आणि जरी अर्जदार यांची मागणी मान्य केली तर सदर कृती ही शासनाच्या धोरणाच्या विरूध्द होईल असा कार्यालयाने सादर केलेला सविस्तर प्रस्ताव वाचणेत आला.

तरी विलास किसन सोनुले (मांग) व महादेव शेशाप्पा पवते (आवटे) यांनी यापुर्वी तत्कालीन इचलकंरजी नगरपरीषदेमध्ये बदली कामगार म्हणून काम केलेले असलेने तसेच रिट पिटीशन क्र.११६३/१९९४ मधील निर्णयानुसार नगरपालिका सेवेमध्ये तत्कालीन बदली कामगारांना सेवेत सामावून घेणेच्या निर्णयास ते पात्र असलेने त्यांना सेवेत घेणेबाबतची मागणी योग्य आहे. तथापि त्यांच्या शैक्षणिक अज्ञानामुळे त्यांनी योग्य प्रयत्न न केलेने किंवा केलेल्या प्रयत्नाबाबत योग्य पाठपुरावा न झालेमुळे आज अखेर त्यांना सेवेत समाविष्ट होता आले नाही, दरम्यानच्या कालावधीत झालेल्या विलंबामुळे त्यांचे नियत वयोमान कालावधी पुर्ण झालेचे लक्षात येते.सदरची परीस्थिती त्यांच्या अशिक्षित पणामुळे तसेच कायद्याच्या अज्ञानामुळे निर्माण झालेली आहे. याचा सहानुभुतीपुर्वक विचार करणेत आला. त्यांच्यावर अन्याय होऊ नये या उद्देशाने त्यांना अथवा सफाई कामगार म्हणुन त्यांच्या वारसास सदर सेवेचा लाभ मिळणेबाबत निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. शासनाकडे मंजुरी साठी सादर करणेत यावा.

सूचक : R.A.Sut.. सौ. छ. अ. सातपुते.

अनुमोदक : [signature] र. सा. रजपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १५
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ४ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या मागासवर्गीय कल्याण समितीचे नाव बदलुन ते समाजविकास समिती करणेबाबत व सदर समितीवर नव्याने २ सदस्य नियुक्त करणेबाबत मा. महासभा ठराव क्र. ४० दि. २७/०३/२०२६ नुसार शिफारस करणेत आलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या दि. २०/०२/२०२६ रोजी झालेल्या सभेमध्ये मा. महासभा ठराव क्र. १० दि. २०/०२/२०२६ नुसार मागासवर्गीय कल्याण सर्वसाधारण समिती स्थापन करणेत आली होती व सदर समितीमध्ये मागासवर्गीय प्रभागामधुन निवडूण आलेल्या सहा सदस्यांची समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेत आलेली होती.

मा. महासभा ठराव क्र. ४० दि. २७/०३/२०२६ नुसार मागासवर्गीय कल्याण समिती या सर्वसाधारण समितीचे नाव मागासवर्गीय कल्याण समिती एवजी समाजकल्याण समिती असे दुरुस्त करुन सदर समितीमध्ये मागासवर्गीय सहा सदस्यांबरोबरच अन्य दोन सदस्य यांची नियुक्ती करणेस मंजुरी देणेत आलेली आहे. तसेच सदर समिती मार्फत फक्त मागासवर्गीय समाज यांचेसाठी योजना न राबविता समाजातील सर्वच आर्थिक दुर्बल स्तरातील नागरीक, दिव्यांग तसेच तृतीयपंथी यांचेसाठीच्या समाजकल्यानकारी योजना राबविणेत याव्या असे ठरावामध्ये नमुद करणेत आले आहे.

वरील प्रमाणे मा. महासभेचे ठरावानुसार मागासवर्गीय कल्याण समितीचे नाव बदलुन समाजकल्याण समिती करणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेच्या तरतुदीनुसार सदर समितीवर अन्य प्रभागातील दोन सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव वाचणेत आला.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या मागासवर्गीय कल्याण समितीचे नाव समाजकल्याण समिती करणेस मंजुरी देणेत येत असुन सदर समितीमार्फत मागासवर्गीय समाजाबरोबरच समाजातील सर्वच आर्थिक दुर्बल स्तरातील नागरीक, दिव्यांग तसेच तृतीयपंथी यांचेसाठीच्या समाजकल्यानकारी योजना राबविणेत याव्यात.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेच्या तरतुदीनुसार सदर समितीवर राजु पुजारी व सपना भिसे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करणेत येत आहे.

सूचक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

अनुमोदक : Satish स. व. कुळकर्णी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ | ठराव क्र. १६
सर्वसाधारण सभा | दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ५ : इचलकरंजी शहरातील जे मिळकत धारक सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील थकबाकीसह दुसऱ्या सहामाही ची संपूर्ण रक्कम आगाऊ भरणा करतील त्यांना प्रस्तावात नमूद प्रमाणे दुसऱ्या सहामाही वरील संयुक्त करात सुट / सवलत देणे बाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतधारकांना सन २०२६/२७ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके माहे एप्रिल २०२६ पासून लागू करणे बाबतची कार्यवाही कर विभागामार्फत सुरु करणेचा मानस आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ कराधान नियम मधील कलम १४० (अ) मध्ये मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत पात्र असणारी कोणतीही व्यक्ती असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमतेच्या वापरकर्त्याच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील अशी तरतूद आहे.

यास अनुसरून सन २०२५/२६ या आर्थिक वर्षात मा. प्रशासकीय ठरावास दि. २२/०४/२०२५ चे मंजुरीने चालू मागणीतील दुसऱ्या सहामाही संयुक्त करावर माहे १५ जुलै २०२५ अखेर १०%, दि.१६ जुलै ते दि.३१ जुलै २०२५ अखेर ४%, दि.०१ ऑगस्ट ते दि.१५ ऑगस्ट २०२५ अखेर ३% व दि. १६ ऑगस्ट ते दि.३१ ऑगस्ट २०२५ अखेर २% अशी सवलत देणेत आलेली होती.

सदर सवलती मध्ये मा. आयुक्तसो यांच्या मान्यतेने मुदत वाढ देण्यात आलेली आहे. सदर सवलतीचा मिळकतधारकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला असून खालीलप्रमाणे सवलतीनुसार संयुक्त कर वसूल झालेला आहे.

| अ. क्र. | कालावधी | वसूल करण्यात आलेली संयुक्त कर | वसूल करण्यात आलेला एकूण मालमत्ता कर | रिबेट रकम |
|---|---|---|---|---|
| १ | माहे १५ जुलै २०२५ अखेर १०% प्रमाणे | ६,०५,५७,९६५/- | १०,६८,०७,८२१/- | २८,०९,१४८/- |
| २ | दि.१६ जुलै ते दि.३१ जुलै २०२५ अखेर ४% प्रमाणे | ४,४७,१७,७५४/- | ७,९१,६१,८२९/- | २०,६९,५३८/- |
| ३ | दि.०१ ऑगस्ट ते दि.१५ ऑगस्ट २०२५ अखेर ३% प्रमाणे | १,४३,०२,३२६/- | २,५१,१४,४८३/- | ४,५९,७९८/- |
| ४ | दि. १६ ऑगस्ट ते दि.३१ ऑगस्ट २०२५ अखेर २% प्रमाणे | ३१,७५,९७८/- | ५६,७८,९१८/- | २४,५१२/- |

अशी एकूण संयुक्त कर रक्कम रु.१२,२७,५४,०२३/- इतकी व एकूण मालमत्ता कर रक्कम रुपये ५३,६२,९९६/- सवलत / सूट कालावधीत वसूल झालेली आहे.

त्यामळे वरील परिच्छेद "2" मध्ये नमूद केल अधिनियमातील तरतुदीनुसार इचलकरंजी शहरातील सर्व मिळकत धारकाचेकरिता की, जे मिळकतधारक सन २०२६/२७ या आर्थिक वर्षातील थकबाकीसह दुसऱ्या सहामाहीची संपूर्ण रक्कम आगाऊ भरणा करतील त्यांना खालील नमूद केलेप्रमाणे दुसऱ्या सहामाहीवरील संयुक्त करावर सूट / सवलत देता येईल.

१) दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत — १०%

२) दि. ०१ ऑगस्ट ते दि.३१ ऑगस्ट २०२६ — ५%

वरीलप्रमाणे सवलत/सूट देणेकरीता महानगरपालिकेच्या धोरणात्मक निर्णय घेनेकामी महासभे समोर सादर करणेस मान्यता मिळावी. मान्यता मिळालेनंतर नागरिकांचे / मिळकतधारकांचे माहितिकरिता मोठ्या प्रमाणात प्रसार माध्यमाचेद्वार प्रसिद्धी / दैनिक वृतपत्रातून जाहीर आवाहन / शहरातील विविध ठिकाणी जाहिरात फलक या माध्यमातून याची अंमलबजावणी करता येईल सबब सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार इचलकरंजी शहरातील जे मिळकत धारक सन 2026-27 या आर्थिक वर्षातील थकबाकीसह दुसऱ्या सहामाही ची संपूर्ण रक्कम आगाऊ भरणा करतील त्यांना प्रस्तावात नमूद प्रमाणे दुसऱ्या सहामाही वरील संयुक्त करात दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत — १०% व दि. ०१ ऑगस्ट ते दि.३१ ऑगस्ट २०२६ — ५% सुट / सवलत देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते.    अनुमोदक : सौ. रु. अ. सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १७
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ६ : इचलकरंजी महानगरपालिकेचे गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय येथील फी व डिपॉझिटमध्ये वाढ करणेस आणि पुस्तक जमा करणेची मुदत यामध्ये वाढ करणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव**

सदर विषयाबाबत आलेली सुचना वाचणेत आली, त्यास एक उपसुचना प्राप्त झाली ती खालील प्रमाणे.

**उपसुचना**

सदर विषयाबाबत कार्यालयाकडून आदेश प्रस्ताव वाचणेत आला. इचलकरंजी महानगरपालिकेचे गुरूवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाची फी व डिपॉझिट मध्ये वाढ करणेस शिव-शाहू आघाडीचा विरोध आहे.

रविंद्रनाथ टागोर वाचनालय सध्या बांधकाम करणेसाठी पाडून ठेवले आहे. सदर काम संथ गतीने चालू आहे. अनेक विद्यार्थी/विद्यार्थिनींची गैरसोय होत आहे. जरी तात्पुरत्या स्वरूपात दुसरीकडे व्यवस्था केली असली तरी ती सोय नीट नाही. पर्याय नसल्यामुळे विद्यार्थी तेथे जात आहेत.

आपल्या शहरातील विद्यार्थी/विद्यार्थिनी MPSC/UPSC शिक्षणासाठी टागोर वाचनालयाचा इतिहास उज्वल आहे. मुळात यातून उत्पन्न वाढविणे हा विषय घेणे चुकीचा आहे. टागोर वाचनालय हे महानगरपालिकेची सेवाभावी अशी शाखा आहे. तरी सुविधा नाहीत, इमारत नाही अशा परिस्थितीमध्ये भाडेवाढ करणे योग्य ठरणार नाही. ज्यावेळी रविंद्रनाथ टागोर वाचनालयाची इमारत बांधून होईल तेव्हा याबाबत विचार करणे योग्य होईल. तरी फी व डिपॉझिट वाढ करणेस विरोध आहे.

**सुचक- उदयसिंग मारुती पाटील.** **अनुमोदक- सचिन लालासे राणे.**

वरील उपसुचना मतास टाकली असता, त्यास-

अनुकुल मते - १४ प्रतिकुल मते – ३४ तटस्थ – ००

वरील प्रमाणे मतदान होवून उपसुचनेस प्रतिकुल मते जास्त पडलेने उपसुचना बहुमताने नामंजुर करणेत आली.

यानंतर मुळ सुचना मतास टाकली असता त्यास -

अनुकुल मते – ३४ प्रतिकुल मते – १४ तटस्थ – ००

वरील प्रमाणे मतदान होवून मुळसुचनेस अनुकुल मते जास्त पडलेने मुळसुचना बहुमताने मंजुर करणेत आली. ती खालील प्रमाणे

**मुळ सुचना**

सदर विषयाबाबत कार्यालयाकडून प्रस्ताव वाचणेत आला.

इचलकरंजी महानगरपालिकेचे गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय सध्या महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय या इमारतीत सर्व- सोयीनियुक्त चालू आहे.

गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकडील पुस्तक खरेदी, वृत्तपत्रे, नियतकालिके आणि मासिके वाचकांना उपलब्ध करून देणे, दरवर्षी गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर व्याख्यानमाला आयोजित केली जाते. यासाठी महापालिकेमार्फत सदर उपक्रमासाठी खर्च केला जातो.

रविंद्रनाथ टागोर वाचनालयाचे मेंटेनन्स खर्च पाहता अभ्यासिका नाममात्र फी वाढविणेकामी मासिक फी व डिपॉझीट न आकारता फक्त वार्षिक फी खालीलप्रमाणे प्रस्तावित करणेत आली आहे.

मे. कौ. ठराव क्र.१८ दि. २०/०७/२०२२ अन्वये वाचनालय अभ्यासिका प्रवेश फॉर्म फी- २५/-, अभ्यासिका ओळखपत्र - २५/-, अभ्यासिका वार्षिक वर्गणी - १००/- याप्रमाणे मंजूर असून एकूण वार्षिक फी र रु. १५०/- आकारली जाते. सन २०२२ नंतर वाचनालय फीमध्ये वाढ करणेत आलेली नाही.

Scanned with OKEN Scanner

कार्यालयाने खालीलप्रमाणे फी वाढ करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

| अ.क्र. | अभ्यासिका, वाचनालय फी वाढ / पुस्तक जमा करणेची मुदत | सध्याची फी/ मुदत | प्रस्तावित शुल्क / मुदत |
|---|---|---|---|
| १ | अभ्यासिका प्रवेश फॉर्म फी | २५ /- | २५/- |
| २ | अभ्यासिका ओळखपत्र फी | २५/- | २५/- |
| ३ | अभ्यासिका वार्षिक वर्गणी<br>(सदर वार्षिक वर्गणी एप्रिल ते मार्च अशी राहील ) | १००/- | ५००/- |
| ४ | वाचनालय प्रवेश फॉर्म फी (नवीन सभासदांकारिता ) | २५/- | २५/- |
| ५ | वाचनालय मासिक फी (सर्व सभासदांकारिता ) | २०/- | ४०/- |
| ६ | वाचनालय सहामाही फी (सर्व सभासदांकारिता ) | ११०/- | २००/- |
| ७ | वाचनालय वार्षिक फी (सर्व सभासदांकारिता ) | २००/- | ४००/- |
| ८ | वाचनालय डिपॉझीट (नवीन सभासदांकारिता ) | २००/- | ३००/- |
| ९ | पुस्तक जमा करणेची मुदत | ७ दिवस | १५ दिवस |

तरी वरीलप्रमाणे अभ्यासिका व वाचनालयासाठी कार्यालयाने सुचविलेल्या फी वाढ पैकी अभ्यासिका वार्षिक वर्गणी रु. ३०० आकारणेस व उर्वरीत फी / शुल्क हे कार्यालयाने प्रस्तावित केलेनुसार आकारणेत यावेत. तसेच पुस्तक जमा करणेची मुदत सात दिवस ऐवजी पंधरा दिवस करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पु. चोपडे.

अनुमोदक : स. व. मुळीक.

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १८
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. ७ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील ई-बस वाहतुकीसाठी मार्ग ठरविणेबाबत परिवहन समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील ई-बस वाहतुकीसाठी मार्ग ठरविणेबाबत परिवहन समिती ठराव क्र. ०१ दि. ३०/०३/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस वाचणेत आली.

इचलकरंजी शहर व परिसरामध्ये जास्तीत जास्त प्रवाशी उपलब्ध होतील अशा पद्धतीने परिवहन समितीने प्राथमिक पणे खालील प्रमाणे प्रस्तावित करणेत आलेल्या मार्गास मंजुरी देणेत येत आहे.

१. इमपा बस स्टँड (छ.शिवतीर्थ)-गांधी पुतळा – महासत्ता चौक – पी.बा. पाटील मळा – टाकवडे - शिरढोण - कुरुंदवाड-नृसिंहवाडी
२. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) - नदी नाका मरगुबाई मंदिर चौक – शिरदवाड - अ.लाट – हेरवाड – तेरवाड – कुरुंदवाड – नृसिंहवाडी.
३. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) - नदी नाका मरगुबाई मंदिर चौक - शिरदवाड आयको इंदिरा स्पिनिग मिल
४. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – नदी नाका मरगुबाई मंदिर चौक - रांगोळी – रेंदाळ – हुपरी - MIDC (कागल)
५. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – कबनूर – चंदूर - रुई – इंगळी – पट्टणकडोली - MIDC एमआयडीसी
६. इमपाः बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – कबनूर – तिळवणी – साजणी - माणगाव – रुकडी - अतिग्रे - चोकाक - हेरले – हालोंडी - शिरोली
७. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – शहापूर – तारदाळ – खोतवाडी – पार्वती इंडस्ट्रीज - कोंडिग्रे फाटा - जयसिंगपुर
८. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – पंचगंगा शुगर फॅक्ट्री – कोरोची - हातकणंगले स्टेशन
९. शहापूर चावडी - इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – कबनूर – लक्ष्मी इंडस्ट्रीज – हातकणंगले – आळते – मिणचे – वाडगाव
१०. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) - जनता बँक – राजवाडा चौक - फोर्चुन प्लाझा - सांगली नाका – खोतवाडी
११. इमपा तस स्टँड (छ.शिवतीर्थ) - शाहू हायस्कूल – संभाजी चौक – D-MART - तीन बत्ती – अलायन्स हॉस्पिटल - शाहू नगर - चंदूर
१२. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – राजबाडा - मरगुबाई मंदिर - चांदणी चौक - D-MART - छ. शाहू महाराज पुतळा – अटल बिहारी वाजपेयी चौक – डेक्कन – पंचगंगा शुगर फॅक्ट्री कारखाना – जावाईवाडी
१३. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा - थोरात चौक - CEPT - महासत्ता चौक - आमराई रोड - आसरा नगर
१४. इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) - ASC कॉलेज - कबनूर चौक – मणेरे हायस्कूल – स्वामी अपार्टमेंट – ठाकरे चौक – मराठा चौक – लिगाडे मळा – जुने एस.टी. स्टँड – अटल बिहारी वाजपेयी चौक - डेक्कन पंचगंगा factory
१५) इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – सांगली नाका – कोंडीग्रे फाटा – मजले – खोतवाडी – संगमनगर
१६) इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – राजवाडा चौक – स्वामी समर्थ केंद्र – लिंबू चौक – धर्मराज चौक – किसान चौक – शाहू पुतळा.
१७) इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – सांगलीनाका – यड्राव फाटा – यड्राव – जांभळी – हरोली – नांदणी – जयसिंगपुर.
१८) इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – शिरदवाड – अब्दुललाट – लाटवाडी – घोसरवाड – दत्तवाड – सैनिक टाकळी – खिद्रापूर.
१९) इमपा बस स्टँड (छ. शिवतीर्थ) – जनता बँक – विक्रम नगर – शहापूर - पंचगंगा factory - डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा – शिवतीर्थ .

सूचक : R.A.Sul.. सौ. रु. अ. सातपुते

अनुमोदक : [signature] र. बा. रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ ठराव क्र. १९
सर्वसाधारण सभा दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. ८ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील ई-बस वाहतुकीसाठी ठिकठिकाणी बस थांबे निश्चित करणे व बस थांबे उभारणीची कार्यवाही करणेबाबत परिवहन समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील ई-बस वाहतुकीसाठी प्रती दोन किलोमीटरच्या अंतरावर शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल, मॉल, सुपर मार्केट, औद्योगिक आस्थापना, इत्यादी ठिकाणी बस थांबे निश्चित करणे व बस थांबे उभारणी करणेबाबत परिवहन समिती ठराव क्र. ०३ दि. ३०/०३/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस वाचणेत आली.

तरी परिवहन समितीने केलेल्या शिफारशीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील ई-बस वाहतुकीसाठी प्रती दोन किलोमीटरच्या अंतरावर शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल, मॉल, सुपर मार्केट, औद्योगिक आस्थापना इत्यादी ठिकाणी बस थांबे निश्चित करणेस व बस थांबे उभारणी मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : R. A. Sut सौ. रु. अ. सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. २०
दि. ३०/०४/२०२६

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

विषय क्र. ९ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी आवश्यक पदभरती करणेसाठी कार्यवाही करणेबाबत परिवहन समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी आवश्यक पदभरती करणेसाठी कार्यवाही करणेबाबत परिवहन समितीने परिवहन समिती ठराव क्र. ०४ दि. ३०/०४/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस वाचणेत आली.

ई बस संचलनाकरिता खालील प्रमाणे मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| १ | डेपो मॅनेजर | १ |
| २ | टेक्निकल इन्सपेक्टर | १ |
| ३ | तिकीट चेकर | ४ |
| ४ | एच आर एक्झीकेटीव | १ |
| ५ | एम आय एस एक्झीकेटीव | १ |
| | एकूण | ८ |

तरी ई बस सेवा सुरु होताना वरील प्रमाणे कंत्राटी पद्धतीने पदभरती करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. ला. रजपुते

अनुमोदक : R.A.Sut.. सौ. रु. अ. सातपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र.२१
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १० : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी तिकीट दर ठरविणेबाबत परिवहन समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी तिकीट दर ठरविणेबाबत परिवहन समितीने परिवहन समिती ठराव क्र. ०५ दि. ३०/०३/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस वाचणेत आली.

पी एम ई-बस सेवेकरिता पुढील प्रमाणे तिकीट दर प्रस्तावित आहे. सदर दर हे महाराष्ट्र शासनाच्या दि. ८ जून २०१९ च्या अधिसूचने प्रमाणे असून, किमान दर खालील प्रमाणे प्रस्तावित (Proposed Fares for AC buses in Rs) करणेत आलेले आहेत.

| Sl. No | Stage in Kms | Maximum fares as per the GoM Notification Dr ०३/०७/२०१९ | Proposed Fares for AC buses In Rs | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Nor AC bus fares | AC fares (१५० % of Adult Non-AC Fares) | Adult | Child |
| १ | ००-०२ | १३ | ३३ | १० | ५ |
| २ | ०२-०४ | १७ | ४३ | १५ | ८ |
| ३ | ०४-०६ | २३ | ५८ | १८ | ९ |
| ४ | ०६-०८ | ३० | ७५ | २० | १० |
| ५ | ०८-१० | ३० | ७५ | २५ | ११ |
| ६ | १०-१२ | ३७ | ९३ | २५ | १२ |
| ७ | १२-१४ | ३७ | ९३ | २८ | १४ |
| ८ | १४-१६ | ४३ | १०८ | ३० | १५ |
| ९ | १६-१८ | ४३ | १०८ | ३२ | १५ |
| १० | १८-२० | ५० | १२५ | ३५ | १८ |
| ११ | २०-२२ | ५० | १२५ | ३५ | १८ |
| १२ | २२-२४ | ५६ | १४० | ४० | २० |
| १३ | २४-२६ | ५६ | १४० | ४० | २० |
| १४ | २६-२८ | ६३ | १५८ | ४५ | २२ |
| १५ | २८-३० | ६३ | १५८ | ४५ | २२ |

तरी इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या पी एम ई-बस सेवेसाठी वरील प्रस्तावित करण्यात तिकीट दरास मंजुरी देणेत येत आहे.

सूचक :

अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र.२२
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. ११ : इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील नागरीकांना प्रासंगिक कारणासाठी बससेवा पुरविणेबाबत परिवहन समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु करणेत येणाऱ्या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील नागरीकांना खालिल प्रमाणे प्रासंगिक कारणासाठी बससेवा पुरविणेबाबत परिवहन समितीने परिवहन समिती ठराव क्र. ०६ दि. ३०/०३/२०२६ नुसार शिफारस करणेत आली असून परिवहन समितीची शिफारस वाचणेत आली.

१) श्रावण महीन्यामध्ये रामलींग साठी बससेवा पुरविणे.
२) दर गुरुवारी नृसिंहवाडी येथे बससेवा देणे.
३) लग्न समारंभासाठी बससेवा पुरविणे.
४) शाळेतील विदयार्थ्यांच्या सहलीकरीता तसेच इतर मागणीस्तव.

तरी परिवहन समितीच्या शिफारशीनुसार इचलकरंजी महानगरपालिके मार्फत सुरु करण्यात येणा-या ई-बस सेवेसाठी इचलकरंजी शहर तसेच इचलकरंजी शहराच्या परिसरातील नागरीकांना वरीलप्रमाणे नमूद प्रासंगिक कारणासाठी बससेवा पुरविण्यासाठी मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : R.A.S. सौ. रु. अ. सातपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ | ठराव क्र. २४
सर्वसाधारण सभा | दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १३ : इचलकरंजी महानगरपालिका मालकीची शॉपिंग सेंटर इमारत व जुनी महानगरपालिका इमारत निर्लेखित करुन सदर ठिकाणी अद्ययावत मार्केट इमारती उभारणी करणेकामी मा. शासनाकडे निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका मालकीची शॉपिंग सेंटर इमारत व जुनी महानगरपालिका इमारत निर्लेखित करुन सदर ठिकाणी अद्ययावत मार्केट इमारती उभारणी करणेकामी मा. शासनाकडे निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. ०९/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका मालकीची जुनी शॉपिंग सेंटर इमारत ही छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा या मुख्य रस्त्यावर लागून असून शहराच्या मध्यवर्ती व मोक्याच्या ठिकाणी आहे. सदर जागेचा सि.स.नं. ८७७४ हा आहे. सदरची इमारत ही सन १९७२ साली बांधण्यात आलेली आहे. सदरची इमारत तीन मजली असून या इमारतीमध्ये दुकानगाळे, खाजगी कार्यालये इ. आस्थापनांचा समावेश आहे. सदर संकुलामधून प्रतीमहा र.रु. १,६६,६६६/- इतकी रक्कम भाडे स्वरूपात जमा होत आहे.

इचलकरंजी महानगरपालिका मालकीची जुनी महानगरपालिका इमारत ही छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा या मुख्य रस्त्यावर लागून असून शहराच्या मध्यवर्ती व मोक्याच्या ठिकाणी आहे. सदर जागेचा सि.स.नं. ९३३९ ते ९३४८ हा आहे. सदरची इमारत ही सन १९६३ साली बांधण्यात आलेली आहे. सदरची इमारत दुमजली असून या इमारतीमध्ये दुकानगाळे, शासकीय कार्यालये, खाजगी कार्यालये, मनपाचे अग्निशमन दल, मनपाचे विभागीय कार्यालय इ. आस्थापनांचा समावेश आहे. सदर संकुलामधून प्रतीमहा र.रु. १,६६,६६६/- इतकी रक्कम भाडे स्वरूपात जमा होत आहे.

सदरच्या इमारती जुन्या असल्यामुळे वेळोवेळी इमारतींची देखभाल दुरूस्ती करावी लागते, हि वस्तुस्थिती आहे. सदरच्या जागा शहरातील मध्यवर्ती व मोक्याच्या ठिकाणी असलेने या ठिकाणच्या जुन्या इमारती काढून घेऊन त्या ठिकाणी व्यापारी संकुल उभारलेस निश्चितच मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या जनता चौक येथील शॉपिंग सेंटरची इमारत ही १९७२ बांधण्यात आलेली असून संबंधित शॉपिंग सेंटर इमारतीस ही ५४ इतकी वर्षे पूर्ण झालेली आहेत. तत्कालीन इचलकरंजी नगरपालिकेसाठी इचलकरंजी शहरामध्ये गांधी पुतळा जवळील येथे जूनी भाजी मार्केट कम ऑफिस इचलकरंजी नगरपालिकेची इमारत सन ०२-१०-१९६३ रोजी बांधण्यात आलेली होती. सदर इमारतीस आजरोजी ६३ इतकी वर्षे पूर्ण झालेली आहे.

सबब जून्या नगरपालिकेच्या इमारतीमध्ये असलेल्या खोल्यांचा वापर हा भाडेतत्वार देणेत आलेला आहे. सध्या जूनी नगरपालिका इमारतीमध्ये तळ मजल्यावर २४ गाळे असून त्यापैकी २२ गाळ्यांचा करार पूर्ण झालेला आहे. व पहिल्या मजल्यावर ८ गाळे शासकीय आहेत. तसेच तळ मजळा आतील बाजूस स्टोअर विभाग जेष्ठ नागरिक संघ, अशी इतर ही गाळे आहेत. व इतर ११ गाळे आहेत. ही वस्तुस्थिती आहे.

सध्या ज्या गाळे धारकांनी महानगरपालिकेचा प्रशासकीय ठराव क्र. ६, दि. २९-०६-२०२४ च्या भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती बैठकी मधील निश्चित सुधारित भाडे व अनामत रक्कम, अटी शर्तीस अधीन राहून गाळ्याचे करार पूर्ण केले आहेत. अशा गाळे धारकांचा नविन इमारतीमध्ये विचार व्हावा याप्रमाणे कार्यालयाने महासभेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका मालकीची शॉपिंग सेंटर इमारत व जुनी महानगरपालिका इमारत निर्लेखित करुन सदर ठिकाणी अद्ययावत छत्रपती शिवाजी महाराज यांचा नावाने व्यापारी संकुल उभा करणेकामी मा. शासनाकडे निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेस किंवा PPP, BOT, UCF अथवा अन्य प्रकारे निधी उपलब्ध करुन शॉपींग सेंटर उभा करुन व जुनी इमारत या ठिकाणी भव्य व्यापारी संकुल बांधणेबाबत योग्य ती पुढील कारवाई करणेस मंजुरी देणेत येत असुन याच प्रमाणे मा. सदस्य, रवी साहेब रजपुते यांनी केले सुचनेनुसार भाग्यरेखा चित्रमंदीर शेजारील व्यापारी संकुल व महात्मा फुले भाजी मार्केट या इमारती निर्लेखीत करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स. व. मुळीक. | अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. पु. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २५
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १४: इचलकरंजी शहरासाठी करणेत येणाऱ्या पाणीपुरवठयासाठी पाटबंधारे विभागाकडुन आकारण्यात येणारा दंड / सेस रद्द करणेबाबत मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

विषयांकितकामी इचलकरंजी शहरासाठी करणेत येणा-या पाणी पुरवठयासाठी पाटबंधारे विभागाकडून आकारण्यात येणार दंड व्याज रद्द करणेतबाबत कामाची पुरक सविस्तर माहिती खालीलप्रमाणे,

इचलकरंजी शहराकरीता पाणी पुरवठा करणेकामी सन १९६५ पासुन पंचगंगा नदी व सन २००१ पासुन कृष्णा नदी मजरेवाडी उदभव येथुन पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहेत. या दोन्ही पाणी पुरवठा योजनेचे पाठबंधारे विभागामार्फत मंजुर पाणी आरक्षण खालीलप्रमाणे,

पंचगंगा पाणी पुरवठा योजना – ८.०५ द.ल.घ.मी. – कोल्हापुर पाटबंधारे विभाग (उत्तर)
कृष्णा पाणी पुरवठा योजना – २२ द.ल.घ.मी. – सांगली पाटबंधारे विभाग

पंचगंगा पाणी पुरवठा योजना –

वरील प्रमाणे पंचगंगा नदीमधुन वार्षिक ८.०५ द.ल.घ.मी. इतके पाणी आरक्षण दि.२६/०६/१९७२ चे आदेशान्वये राधानगरी प्रकल्पातून मंजुर आहे. सदरचे आरक्षण हे घरगुती / पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनार्थ मंजुर करणेत आले आहे.

कृष्णा पाणी पुरवठा योजना –

कृष्णा नदीमधुन वार्षिक २२ द.ल.घ.मी. इतके पाणी आरक्षण दि. १३/०३/२००३ च्या आदेशान्वये कृष्णा नदीमधुन मंजुर आहे. सदचे पाणी आरक्षण हे पिण्याचे पाणी व ओद्योगिक वापराचे पाणी या प्रयोजनार्थ आहे.

जलसंपदा विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शहरीकरणामध्ये लोकसंख्येत होणारी वाढ व त्यानुसार शहरामध्ये वाढणारा वाणिज्य पाणी वापर याबाबी विचारात घेवुन पाटबंधारे विभागामार्फत वाणिज्य प्रकाराची वर्गवारी नव्याने निर्माण करुन या प्रकारामध्ये हॉटेल, शाळा व कॉलेज (महाविद्यालय), होस्टेल, बगीचा, दवाखाना, व्यावसाईक कार्यालय या घटकांचा समावेश केला आहे. सध्या कृष्णा नदीवरुन करणेत येणा-या पाणी उपसावर पिण्याचे पाणी, औदयोगिक वापराचे पाणी व वाणिज्य वापराचे पाणी या ०३ वर्गवारी मध्ये अनुक्रमे ९०%, ५%, ५% या प्रमाणात विभाजन होवुन पाणी पटटी आकारणी करणेत येत आहे.

वरील दोन्ही योजनांकरीता इचलकरंजी शहर महानगरपालिकेस पाटबंधारे विभागाकडून दर द्विमासिक/ मासिक देयक सादर करण्यात येतात. या देयकामध्ये खालील नमुद केलेप्रमाणे वर्गवारी निहाय शुल्क आकारणी करणेत येते.

बिगर सिंचन पाणीपटटी
स्थानिक उपकर (लोकलसेस)
दंड (व्याजा समवेत)
विलंब आकार

बिगर सिंचन पाणी पटटीमध्ये पंचगंगा नदी पाणी पुरवठा योजना घरगुती वापराचे पाणी या अंतर्गत व कृष्णा पाणी पुरवठा योजनेमध्ये घरगुती, वाणिज्य, औदयोगिक या वापरामध्ये पाणी पटटी आकारली जाते. या पाणीपटटीचे प्रती घनमिटर पाणी उपसास अनुसरुन आकारणेत येणारे शुल्क खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | पाणी वापराचा प्रकार | प्रती घनमिटर असणारे सध्याचे दर (र.रु) |
|---|---|---|
| १ | घरगुती | १.३२ |
| २ | वाणिज्य | ६.६० |
| ३ | औदयोगिक | २६.४० |

स्थानिक उपकर (लोकलसेस) हा एकुण पाणी वापराच्या पाणी पटटीच्या २०% प्रमाणामध्ये आकारणेत येतो.

राज्यातील महानरगपालिकांना मुद्रांक शुल्क (अनुदान) आणि इतर अनुदान या सदराखाली शासन स्तरावर देण्यात येणाऱ्या अनुदानातून जलसंपदा विभागाची थकीत पाणीपट्टी अदा करणेबाबत मा. मुख्यसचिव महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दि.३०/०४/२०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच याबाबत करावयाच्या कार्यवाही करीता मा. प्रधान सचिव (नवी-२), नगरविकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. २२/११/२०२४ रोजी बैठक पार पडली असून सदर बैठकीमध्ये जलसंपदा विभागाकडे भरावयाची थकीत असणारी पाणीपट्टी संदर्भात Disputed व Undisputed रक्कम महानगरपालिका व जलसंपदा विभागाच्या समन्वयाने सादर करणेसंदर्भात आदेशित केलेले आहे. त्यानुसार, इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत जलसंपदा विभागाकडे भरावयाच्या थकीत पाणीपट्टी संदर्भात ताळमेळ घेणे कामी कोल्हापूर पाटबंधारे विभाग व सांगली पाटबंधारे विभाग यांची एकत्रित रित्या मा. आयुक्तसो यांचे दालनात बैठक पार पडली. या बैठकीमध्ये चर्चा केलेप्रमाणे याबाबतचा ताळमेळ अंतिम करणेत आलेला आहे व त्यानुसार सध्या मार्च २०२६ अखेर प्राप्त बिलास अनुसरुन असणारा ताळमेळ खालीलप्रमाणे,

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | मंजूर पाणी उपसा स्त्रोत | पाणी वापराच्या अनुषंगाने प्रचलित जल दरानुसार पाणीपट्टी ची आकारणी | मंजूर पाणी आरक्षण | लोकल सेस (२०% अधिभार) आकारणी | विलंब शुल्क | व्याज व दंड, प्रदूषण दंड | इतर शुल्क | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| अ | कोल्हापूर पाटबंधारे विभाग | | | | | | | |
| | घरगुती | ८५,०२,८५० | ८.०५ द.ल.घ.मी. | १८,४१,२५ | १,७८,८०० | ५,०५,३७,०९१ | | ६१,०६,००,११ |
| | वाणिज्य | २,२७,९८,५६७ | | ४५,५१,७ | ७,२८,२१३ | २,९०,२२,५२९ | | ५,७१,०९,०२० |
| | औद्योगिक | ३,०३,९८,०७९ | | ६०,७९,६१ | ४८,८८,५३७ | ३,७७,१०,०९५ | | ७,९०,७६,३२७ |
| | | | | | | एकूण (अ) | | १९,७२,४५,३५८ |
| २ | सांगली पाटबंधारे विभाग | | | | | | | |
| | घरगुती | ४,२९,३६,७८९ | २२.०० द.ल.घ.मी. | १,४२,३६,७५ | १,६४,१५,०९९ | ६,३३,३९,९०१ | | १३,६९,२८,५४० |
| | वाणिज्य | ७५,८०,१२४ | | ११,३४,८६७ | ३,५८,९९४ | ९४,०२,३९९ | | १,८४,७६,३८४ |
| | औद्योगिक | ४,२७,३३,४२४ | | १,६१,७३,७१ | १,७६,५५,९८१ | ७,१०,२१,९५४ | | १४,७५,८५,०७६ |
| | | | | | | एकूण (ब) | | ३०,२९,९०,००० |

मध्यंतरीच्या कालावधी मध्ये सन २०१७ मध्ये वारणा नदी दानोळी येथुन अमृत १.० योजनेमधुन इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजना मंजुर करणेत आली. यावेळी वारणा नदीमधुन ३०.२२ द.ल.घ.मी. (जवळपास १ टिएमसी) पाणी आरक्षण महानगरपालिकेस मंजुर करणेत आले होते. सदर आरक्षण मंजुर करतेवेळी पाटबंधारे विभागामार्फत जारी करणेत आलेल्या ज्ञापनामध्ये आरक्षण मंजुर करणेकरीता कृष्णा पाणी पुरवठा योजनेवर असणा-या पाणी पटटीची थकबाकी दंड व व्याजासह र.रु. १८.३३ कोटी इतकी भरणा करणेकामी करणेत आली होती. सदर थकबाकी पैकी र.रु. ३५ लक्ष हे नोव्हेंबर २०१६ मध्ये भरणा करणेत आले होते. उर्वरीत र.रु. १७.९८ कोटी इतकी रक्कम समान तीन हप्त्यामध्ये भरणा करणेस कळविले होते परंतु पाणी पटटी व्याज व दंड या सहीत ताळमेळ घेतला असता थकबाकीची रक्कम ही १४.१५ कोटी इतकी असलेचे निश्चित करणेत आले. त्यानुसार सदरची सर्व रक्कम १. र.रु. ४.२५ कोटी दि. ३१/१०/२१७ रोजी २. र.रु. ४.२५ कोटी दि. २९/०९/२०१८ व ३. र.रु. ४.२५ कोटी दि. २८/०२/२०२३ रोजी अशी एकुण र.रु. १२.७३ कोटी व बँक गॅरटी स्वरुपात र.रु. १.७१ कोटी या प्रमाणे र.रु. १४.४७ कोटी इतकी रक्कम पाटबंधारे विभागाकडे भरणा करणेत आलेली आहे. सदर वारणा नदीवरुन असणारे पाणी आरक्षण व्यपगत नसुन अदयाप मंजुर आहे. वरील नमुद केले प्रमाणे महानगरपालिकेने यापुर्वी वारणा नदीवरुन आरक्षण मिळणेकरीता कृष्णा नदी वरुन असलेल्या पाणी योजनेची पुर्ण थकबाकी भरणा केलेली आहे. सध्या शासनामार्फत जलसंपदा विभागाकडे असणा-या थकीत बिलाबाबत धोरण निश्चित करणेकरीता सुरु असलेल्या बैठकीमध्ये ही बाब निर्देशनास आणुन देणेत आली असुन सदर व्याज व दंडापोटी देणेत आलेली रक्कम ही पाणी पटटी आकारणीच्या रक्कमेमध्ये वर्ग करणेबाबत चर्चा करणेत आलेली आहे. याबाबत अदयाप कोणताही निर्णय झालेला नाही. सदर पाणी पट्टी थकबाकीची र.रू. ५०,०२,३५,३५८/- इतकी आहे. त्यामध्ये दंड व विलंब आकार र.रू. ३०,१२,५९,५९३/- इतका आहे. त्यापैकी माहे मार्च २०२६ मध्ये पाणीपट्टी व लोकलसेस असे र.रू. ३,८३,५५,४११/- इतकी रक्कम पाटबंधारे विभागाकडे भरणा केलेली आहे. तरी र.रू. ३०,१२,५९,५९३/- दंड व विलंब आकार पुर्ण पणे माफ होणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेकरीता ठराव पारीत होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शहरासाठी करणेत येणाऱ्या पाणीपुरवठयासाठी पाटबंधारे विभागाकडुन आकारण्यात येणारा दंड / सेस रद्द करणेबाबत मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक: A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

अनुमोदक: स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ ठराव क्र. २६
सर्वसाधारण सभा दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १५ : महानगरपालिका सदस्य स्वेच्छा निधीतुन करावयाची कामे व त्यांची कार्यपद्धती निश्चित करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभा दि. २७/०३/२०५ ठराव क्रमांक ४० प्रमाणे महानगरपालिकेच्या प्रत्येक सदस्यांसाठी रु. ७.५० लाख व महापौर उपमहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता यांना अतिरिक्त प्रत्येकी र.रु. ५० लाख याप्रमाणे स्वेच्छा निधी मंजूर करण्यात आला असून त्यास सदस्य स्थानिक विकास निधी असे संबोधण्यात यावे. त्याचे वापराबाबत कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक आहे. यानुसार पुढील मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करणेत यावा.

१. प्रत्येक सदस्यास आपले प्रभागातील रस्ते, गटर, ड्रेनेज, पाणी पुरवठयाशी संबंधित कामे तसेच व्यायाम शाळा साहित्य दुरुस्ती संबंधित कामे, सार्वजनिक शौचालय दुरुस्ती, सार्वजनिक ठिकाणी रंगरंगोटी करणे इ. कामे प्राधान्याने करता येतील.

२. अनु. जाती / जमातीच्या वक्त्यांमध्ये समाज मंदिरे, सार्वजनिक जागावर आवश्यक सुधारणा करता येतील.

३. महापालिका कार्यालयाच्या बागेच्यांमध्ये खेळणी, व्यायामाचे साहित्य बसविणे, दुरुस्ती करणे.

४. क्रीडांगण विकसित करण्यासाठी खर्च करणे.

५. सार्वजनिक मुतारी उभारणे, दुरुस्त करणे.

६. महापालिका जागेत विद्युत खांब बसवणे, विद्युत व्यवस्था करणे.

७. महापालिका जागेत रहदारीला अडथळा न करता सिमेंट / लोखंडी बाक बसविणे.

८. शहर सौंदर्यीकरण, वृक्षसंवर्धन यासाठी वृक्ष व इतर तसेच सार्वजनिक स्वच्छतेसाठी साहित्य पुरवणे.

याप्रमाणे कामे हाती घेता येतील.

वरील सर्व प्रकारचे कामांसाठी अॅटम प्रमाणे वार्षिक दर निश्चित करून समान दराने काम करणेस तयार असणाऱ्या एक वा एकापेक्षा अनेक मक्तेदारांकडून वार्षिक कामाचे दर करार करण्यात यावेत.

उपरोक्त एक ते सहा पैकी अनुज्ञेय असणारे कामांची मागणी संबंधित सदस्यांद्वारे लेखी पत्राद्वारे आयुक्तांकडे करण्यात यावी. आयुक्त संबंधित विभाग प्रमुखास यासंदर्भात आदेशित करतील, कामाची पाहणी करून आवश्यकतेनुसार अंदाजपत्रक करून वार्षिक दर कराराचे मक्तेदारास सदरचे काम पूर्ण करण्याबाबत कार्यादेश देण्यात यावेत स्वेच्छा निधीतून सदस्याने करावयाच्या प्रत्येक कामाची अंदाजीत र. रु. २ लाख पेक्षा अधिक असू नये. तर महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता यांना प्रत्येक अंदाजीत काम रु ७ लाखापेक्षा अधिक रक्कमेचे करता येणार नाही.

पुढील कामे नगरसेवकांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून ( स्वेच्छा निधीतून ) करता येणार नाहीत.

१) खासगी संस्थांची / सहकारी संस्थांची / वैयक्तिक लाभधारकांची कामे.

२) रु. २.०० लाखांपेक्षा जास्त अंदाजित खर्चाची म्हणजे मोठ्या स्वरूपाची कामे

३) कोणत्याही प्रकारची (प्राथमिक शाळा खोलीची व विशिष्ट वस्त्यांमधील समाज मंदिरांची सर्वसाधारण दुरुस्ती व इमारत दुरुस्तीची वगळून) दुरुस्तीची कामे.

४) एखाद्या मोठ्या कामाला कमी पडणारी पूरक म्हणून तरतूद.

५) एखाद्या मोठ्या कामांसाठी निरनिराळ्या स्रोतांतून निधी मिळविण्याच्या प्रयत्नात एक स्रोत म्हणून या कार्यक्रमाखाली तरतूद सुचविणे.

६) मोठ्या कामांचे (रु. २.०० लाखांच्या वरील) भाग करून ती लहान कामे म्हणून घेणे.

७) खासगी संस्थांना / सहकारी संस्थांना अनुदान.

८) घरकुले.

९) स्मारके / स्मृती.

१०) प्राथमिक शाळा खोली सोडून इतर शाळा / विद्यालये / महाविद्यालये यांच्या इमारती, त्यांना कुंपण घालणे इत्यादी.

११) अनधिकृत वस्त्यांमध्ये कोणत्याही कामासाठी वापरता येणार नाही.

१२) महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता याखेरीज इतर सर्व सदस्यांना सदरचा निधी फक्त आपल्या प्रभागातच वापरता येईल.

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे मार्गदर्शक तत्वांना महापालिका सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणेबाबत मा. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. ०९/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

तरी वरील प्रमाणे महानगरपालिकेच्या प्रत्येक सदस्यांसाठी रु.७.५० लाख व महापौर उपमहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता यांना अतिरीक्त प्रत्येकी र.रु.५० लाख याप्रमाणे स्वेच्छा निधीमधुन करावयाची कामे व यासाठीच्या मार्गदर्शक तत्वांना मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : R.A.Sut.. सौ. रु. अ. सातपुते.

अनुमोदक : श्री. र. सा रजपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २८
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. १६ : इचलकरंजी महानगरपालिका रि. स.नं. ५९९ प्र. क्र. १४ मधील नविन बांधणेत आलेल्या उद्यानास माऊली उद्यान असे नामकरण करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी व दत्तनगर परिसरातील नवशा मारुती मंदीराजवळील महापालिकेने विकसीत केलेल्या उद्यानास कै. नितिन अशोकराव जांभळे यांचे नाव देणेबाबत सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं.५९९ प्र.क्र.१४ येथे उद्यान विभागामार्फत नव्याने उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. सदर उद्यान हे महानगपालीकेच्या मालकीचे असून सध्या त्या उद्यानास कोणतेही नाव देणेत आलेले नाही.

सदर उद्यानाचा वापर स्थानिक नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांकडून मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असून, सामाजिक व पर्यावरणीय दृष्टीने सदर उद्यानास महत्त्व प्राप्त झालेले आहे.

सदर उद्यानास "माऊली उद्यान" असे नामकरण करण्याबाबत मा.सभागृह नेते श्री.विठ्ठल पुंडलिक चोपडेसो, यांनी पत्रानुसार मागणी केलेली आहे.

तसेच इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील दत्तनगर परिसरामध्ये नवशा मारुती मंदिराजवळ महानगरपालिकेमार्फत एक उद्यान विकसित करण्यात आलेले आहे. सदर उद्यान परिसरातील नागरिकांसाठी विरंगुळा, व्यायाम व सामाजिक उपक्रमांसाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित झालेले आहे.

स्थायी समिती सभापती, श्री. सतिश वसंतराव मुळीक, यांनी दत्तनगर परिसरातील कै. नितीन अशोकराव जांभळे हे माजी नगरसेवक होते त्यांनी आपल्या कार्यकाळात सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक कामांमध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांनी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध लोकहितकारी उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन सदर उद्यानास "कै. नितीन अशोकराव जांभळे उद्यान" असे नामकरण करण्याबाबत पत्राद्वारे मागणी केली आहे.

याचबरोबर मा. सदस्य र. सा. रजपुते यांनी इचलकरंजी शहरातील औद्योगीक व कामगार क्षेत्रात कार्यरत असणारे कै. शामराव कुलकर्णी यांचे नाव प्र. क्र. १० सोन्या मारुती मंदिर ते पूर्वेस येणाऱ्या इंडस्ट्रीज इस्टेट कडील रस्त्यास देणेबाबत मागणी केले व मा. सदस्य रा. सं. बोंद्रे, यांनी गट नं १४६ येथे विकसीत करणेत आलेल्या उद्यानास शंभुराजे उद्यान असे नाव देणेची मागणी केली आहे.

महानगरपालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक स्थळांचे नामकरण करण्याचा अधिकार महासभेकडे असल्यामुळे सदर बाबीवर अंतिम निर्णय महासभेमार्फत घेणे आवश्यक आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या रि. स.नं. ५९९ प्र. क्र. १४ मधील नविन बांधणेत आलेल्या उद्यानास माऊली उद्यान असे नामकरण करणेस व दत्तनगर परिसरामध्ये नवशा मारुती मंदिराजवळ महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात आलेल्या उद्यानास कै. नितीन अशोकराव जांभळे असे नामकरण करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच प्र. क्र. १० सोन्या मारुती मंदिर ते पूर्वेस येणाऱ्या इंडस्ट्रीज इस्टेट कडील रस्त्यास इंटक नेते कै. शामरावजी कुलकर्णी मार्ग असे नामकरण करणेस व गट नं. १४६ येथील उद्यानास शंभुराजे उद्यान असे नाव देणेसही मंजुरी मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते.

अनुमोदक : नि. कि. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. २८
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १७ : इचलकरंजी शहरामध्ये घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेकामी नियुक्त करणेत आलेले मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांचे कामाबाबत सदस्य व नागरीकांच्या तक्रारी असलेने चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्याचे काम दि.11/10/2024 रोजीच्या कार्यादेश नुसार मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांना देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार यांचेकडून दि.16/10/2024 पासून कचरा संकलन व उठावाचे काम सुरू आहे. तथापि, सदर मक्तेदाराच्या कामकाजाबाबत अलीकडच्या कालावधीमध्ये लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीत नियोजित वेळेनुसार घरोघरी घंटागाडी मार्फत कचरा संकलन व उठाव न होणे,कचरा संकलनासाठी आवश्यक मनुष्यबळ व वाहनांची अपुरी उपलब्धता असणे तसेच कोणतीही पूर्वकल्पना न देता वारंवार कर्मचाऱ्यांकडून संप करणे इ. त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.वरील त्रुटींमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे.मक्तेदार यांना वेळोवेळी तोंडी सूचना, लेखी नोटीस व दंडात्मक कारवाई करूनही त्यांच्या कामकाजामध्ये समाधानकारक सुधारणा झालेली नाही. तसेच करारातील अटी व शर्तींचा भंग झालेला असून सदर मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांना अंतिम नोटीस बजावून नविन ठेका देणेबाबत निविदा प्रक्रियेची पुर्तता होईपर्यंत काम सुरु ठेवणे तसेच घरोघरी कचरा संकलनाचा ठेका रद्द करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शहरामध्ये घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेकामी मक्तेदार यांचेकडुन नियोजित वेळेनुसार घरोघरी घंटागाडी मार्फत कचरा संकलन व उठाव न होणे,कचरा संकलनासाठी आवश्यक मनुष्यबळ व वाहनांची उपलब्धता नसणे तसेच कोणतीही पूर्वकल्पना न देता वारंवार कर्मचाऱ्यांकडून संप करणे या गोष्टी वारंवार घडत आहेत यामुळे घरोघरी कचरा गोळा करणेच्या कामावर मोठा परिणाम होत असुन शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. मक्तेदार यांना कार्यालयाकडुन वेळोवेळी तोंडी सूचना, लेखी नोटीस व दंडात्मक कारवाई करूनही त्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा झालेली नाही. मक्तेदार यांनी करारातील अटी व शर्तींचा भंग केलेला आहे त्यामुळे नागरीक व नगरसेवकांच्या तक्रारी आणि शहराचे आरोग्याचा विचार करुन त्यांचा कामाचा मक्ता आज दि. ३०/०४/२०२६ रोजी अखेर पासुन मुदत पुर्व रद्द करणेत येत आहे. मात्र घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेकामी अंदाजपत्रक तयार करुन व नव्याने निविदा प्रक्रिया करुन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांचे कडुन काम करुन घेणेत यावे.

सूचक : R.A.Sut.. सौ. ऋ. अ. सातपुते

अनुमोदक : [signature] र. बा. रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३०
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. १९ : श्री. रुबन सखाराम आवळे यांनी दि. ०९/ ०३ /२०२६ नुसार परिवहन समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असुन सदरचा राजीनामा मा. महासभेमध्ये मंजुर करुन रिक्त होणाऱ्या जागी सदस्य यांचे नामनिर्देशन करणेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या दि. २०/०२/२०२६ रोजी झालेल्या सभेमध्ये मा. महासभा ठराव क्र. ८ दि. २०/०२/२०२६ नुसार . रुबन सखाराम आवळे यांचे परिवहन समितीवर नामनिर्देशन करणेत आले होते. तसेच दि. ०९/०३/२०२६ च्या सर्वसाधारण सभेमध्ये श्री. रुबन सखाराम आवळे यांचे मागासवर्गीय कल्याण समितीच्या सभापती निवड झाली होती.

श्री. रुबन सखाराम आवळे यांनी दि. ०९/०४/२०२६ चे पत्रानुसार मागासवर्गीय कल्याण समितीचा सभापती म्हणून कार्यरत असलेने परिवहन समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ पोटकलम (९) नुसार परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पदाचा स्विकार न केल्यास किंवा अशा समितीचा सदस्य मरण पावल्यास, त्याने राजीनामा दिल्यास किंवा तो अनर्ह ठरल्यास किंवा तो काम करण्यास असमर्थ असल्यास किंवा कलम २६ च्या तरतुदी अन्वये त्याचे पद रिकामे झाल्यास अशी रिकामी झालेली जागा महानगरपालिकेने त्या जागी यथोचीत अर्हता प्राप्त व्यक्तीची नेमणूक करुन सोईस्कर पणे शक्य तितक्या लवकर भरली पाहिजे आणि अशी व्यक्ती ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत पद धारण करेल अशी तरतुद आहे.

वरील प्रमाणे तरतुदीनुसार श्री. रुबन सखाराम आवळे यांनी परिवहन समिती सदस्य पदाचा दिलेला राजीनामा मंजुर करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेच्या तरतुदीनुसार परिवहन समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी श्री . रुबन सखाराम आवळे यांनी परिवहन समिती सदस्य पदाचा दिलेला राजीनामा मंजुर करणेत येत असुन रिक्त झालेल्या सदस्य पदावर डॉ. प्रियंका प्रसाद इंगवले यांचे नामनिर्देशन करणेत येत असुन डॉ. प्रियंका प्रसाद इंगवले यांची नेमणूक श्री . रुबन सखाराम आवळे यांनी ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्याच मुदतीपर्यंत असेल.

सूचक : [signature] स. व. मुळीक

अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३१
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २० : वैयक्तिक / खाजगी जागेतील साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणेबाबत तसेच खाजगी / वैयक्तिक मिळकत धारकांना त्यांच्या जागेस कंपाऊंड करुन घेणेबाबत कळविणेस तसेच जागा मालकांनी त्यांचे जागेतील न हटविलेस सदरचा कचरा महानगरपालिकेमार्फत हटवुन जागा मालकास दंड आकारणेबाबत तसेच सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवरील दंडात्मक रक्कमेत वाढ करणेबाबत मा. अनिल देवकरण डाळया, उपमहापौर यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

संदर्भीय विषयास अनुसरून शहरातील सार्वजनिक ठिकाणे व रस्त्यावर कचरा टाकण्याच्या वाढत्या प्रकारांना आळा घालण्यासाठी दंडात्मक रक्कमेत वाढ करणेच्या मागणीबाबत महाराष्ट्र म.न.पा. अधिनियम मधील तरतुदीनुसार रस्ते, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे तसेच अस्वच्छता निर्माण करणाऱ्यावर कार्यवाही करणे व घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अन्वये कचरा उघड्यावर टाकणे, जाळणे अथवा अयोग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे हे दंडनीय कृत्य ठरविण्यात आले आहे. सदरच्या दंडात्मक रक्कमेमध्ये वाढ करणेसाठी इचलकरंजी महानगरपालिकेचा स्वतंत्र उपविधी ( bylaws) तयार करणे आवश्यक आहे.

मा. उपमहापौर यांच्या मागणीनुसार सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक रक्कमेत वाढ करणेसाठी महासभेची मान्यता मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी शहरातील सार्वजनिक ठिकाणे व रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर खालील प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

1. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे
व्यक्ती: ₹१००० ते ₹ ५०००
दुकानदार: ₹३००० – ₹१००००
2. रस्त्यावर / मोकळ्या जागेत कचरा जाळणे
₹१,००० ते ₹२,०००
3. प्लास्टिक बंदीचे उल्लंघन
₹५,००० – ₹२५,०००
4. घरगुती / दुकानातील कचरा उघड्यावर टाकणे
₹१००० ते ₹५०००
5. बांधकाम व पाडकाम कचरा (C&D Waste) टाकणे
₹१०००० ते ₹५००००
6. हॉटेल / रेस्टॉरंटने कचरा व्यवस्थापन नियम न पाळणे
₹१०००० ते ₹५००००
7. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे / घाण करणे
₹१०० – ₹२००
8. कचरा वर्गीकरण न करणे
घरगुती: ₹५०० – ₹२०००
व्यावसायिक: ₹२००० – ₹५०००

याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही सुरु करावी व सदर दंडात्मक कार्यवाहीबाबतची उपविधी तयार करुन सदर उपविधी मा. महासभेच्या मंजुरी साठी सादर करणेत यावी.

सूचक : A. P. Bachate सौ. अ.प्र. बचाटे अनुमोदक : [signature] दे.व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 32
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. २१ : कागल व जयसिंगपुर धर्तीवर इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील नेहरु नगर झोपडपट्टी, रेणुका नगर झोपडपट्टी, नमाजगा माळ झोपडपट्टी, धारवड झोपडपट्टी भागातील नागरीकांना प्रॉपर्टी कार्ड देणेबाबत मा. रवि साहेब रजपुते, नगरसेवक यांनी दि. १६/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत.

**ठराव**

इचलकरंजी शहर हे औद्योगिक शहर आहे. त्यामुळे कामाच्या निमित्ताने आसपासच्य राज्यातील लोक इचलकरंजी शहरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. इचलकरंजी शहरामध्ये नेहरू नगर, रेणूका, नमाजगी, धारवट येथील झोपडपट्टीतील सन १९९५ च्या अगोदर राहणाऱ्या नागरिकांना राहत्या ठिकाणी हक्काची घरे बांधून देणार असलेबाबतची शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करावी अशी मागणी केली सन्मानिय सदस्य मा. रवि साहेब रजपुते यांनी त्यांच्या दि. १६-०२-२०२६ रोजीच्या पत्रात मागणी केली आहे.

सदर पत्रामध्ये मा. सदस्य यांनी इचलकरंजी शहरातील उपरोक्त झोपडपट्टीतील परिसराचे पुनर्वसन झाले नाही. व शासन दोन ते तीन मजली घर देण्यास तयार असले तरी त्यास झोपडपट्टीधारंकाचा विरोध असलेने म्हाडासारख्या योजना शहरात पूर्ण होत नाहीत. त्यामुळे झोपडपट्टीतील नागरिकांचा पक्क्या घराचा प्रश्न तसाच प्रलंबित राहिला आहे.

मा. सदस्य महोदयांनी सदर झोपडपट्टी धारकांना कागल व जयसिंगपूर धर्तीवर प्रॉपर्टी कार्ड मिळणे बाबत मिळणे मागणी केली आहे. तरी सदर मागणी करिता झोपडपट्टी घोषित असले बाबत बांधकाम विभागाकडून अभिप्राय घ्यावा लागेल. तसेच सन १९९५ च्या अगोदर राहणाऱ्या नागरिकांना राहत्या ठिकाणी पक्के घर देण्याबाबतचे शासन परिपत्रकासंदर्भातील संपूर्ण माहितीही बांधकाम विभागाकडे मिळेल. तदनंतर सदरच्या जागेचे आरक्षणा संदर्भात सहा. संचालक नगररचना विभागाकडून अभिप्राय घ्यावा लागेल. त्यानंतर नगर भपूमापन अधिकारी यांना पत्र द्यावे लागेल. याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. असा अभिप्राय मिळकत परिवेक्षक यांनी दिला आहे.

याबाबत सहा. संचालक नगररचना विभाग यांचेकडुन खालील प्रमाणे अभिप्राय सादर करणेत आला आहे.

1. नेहरूनगर झोपडपट्टी - इचलकरंजी TPS NO. II ,FINAL PLOT NO.E , OPEN SPACE या आरक्षणा मध्ये समाविष्ट होत असून सदर झोपडपट्टी दि. २५/०५/१९८१ चे मंजूर विकास योजना इचलकरंजी - सुधारित चे प्रस्तावाप्रमाणे आरक्षण क्र. १३८ — झोपडपट्टी पुनर्वसन या आरक्षणामध्ये समाविष्ट होते आणि प्रारुप विकास योजना इचलकरंजी — सुधारितचे कलम ३०/१ प्रमाणे सदर ठिकाणी आरक्षण क्र. —V/४ स्लम रिहॅबिलिटेशन स्किम हे आरक्षण प्रस्तावित केले आहे.

2. रेणूका झोपडपट्टी- इचलकरंजी TPS NO. II,FINAL PLOT NO. १६ मध्ये समाविष्ट होत असून सदर जागेचा रि.स.नं.५९३ पै. असून सि.स.नं. १२५१२, १२५१२/१ ते १९२ हे आहेत. सदर झोपडपट्टी दि. २५/०५/१९८१ चे मंजूर विकास योजना इचलकरंजी - सुधारित चे प्रस्तावाप्रमाणे रिक्रिएशनल ॲक्टिव्हिटीज ॲन्ड ओपन स्पेस या विभागामध्ये भागश: आणि विद्यमान रस्त्यामध्ये भागश: समाविष्ठ होते आणि प्रारुप विकास योजना इचलकरंजी — सुधारितचे कलम ३०/१ प्रमाणे सदर जागा नॉन नोटिफाईड स्लम व इचलकरंजी रि.स.नं.५९३ च्या मंजूर रेखांकनामधील ' ओपन स्पेस ' मध्ये भागश: आणि रेखांकन रस्त्यामध्ये भागश: समाविष्ट होते.

३.निमजगा झोपडपट्टी- सदर झोपडपट्टीची जागा ही टि.पी. स्किम इचलकरंजी नंबर II , अंतिम भूखंड क्र. १५मध्ये भागश: आणि अंतिम भूखंड क्र. H मध्ये भागश: समाविष्ट होते. सदर जागेचा रि.स.नं. ५९३ हा असून सि.स.नं. १३०९२, १३०९२/१ ते ५७, १३०९३ हे आहेत. सदर झोपडपट्टी दि. २५/०५/१९८१ चे मंजूर विकास योजना इचलकरंजी - सुधारित चे प्रस्तावाप्रमाणे आरक्षण क्र. ११३ —एक्स्टेन्शन टू इदगाह या आरक्षणामध्ये समाविष्ट होते आणि प्रारुप विकास योजना इचलकरंजी — सुधारितचे कलम ३०/१ प्रमाणे सदर जागा नोटिफाईड स्लम मध्ये भागश: आणि आरक्षण क्र. — V/२७ — म्युनिसिपल परपज मध्ये भागश: हे आरक्षण प्रस्तावित केले आहे.

4.धारवट झोपडपट्टी - सदर झोपडपट्टीची जागा ही टि.पी. स्किम इचलकरंजी नंबर II अंतिम भूखंड क्र. १६ मध्ये समाविष्ट होते. सदर जागेचा रि.स.नं. ५९३ पै. असून सि.स.नं. १२५२३ हा आहे. सदर झोपडपट्टी दि. २५/०५/१९८१ चे मंजूर विकास योजना इचलकरंजी - सुधारित चे प्रस्तावाप्रमाणे रिक्रिएशनल ॲक्टिव्हिटीज ॲन्ड ओपन स्पेस या विभागामध्ये भागश: आणि विद्यमान रस्त्यामध्ये भागश: समाविष्ठ होते आणि प्रारुप विकास योजना इचलकरंजी — सुधारितचे कलम ३०/१ प्रमाणे सदर जागा नोटिफाईड स्लम मध्ये समाविष्ट होते.

Scanned with OKEN Scanner

तरी इचलकरंजी शहरातील शासन निर्णयानुसार घोषित झालेल्या सर्वच (२३) झोपडपट्टीतील नागरीकांना ते सद्या राहत असलेल्या जागेचे प्रॉपर्टी कार्ड देणेसाठी कागल, जयसिंगपुर व कोल्हापुर येथील झोपडपट्टीतील नागरीकांना कोणत्या आधारे प्रॉपर्टी कार्ड देणेत आले आहे याचा सविस्तर अभ्यास करणेसाठी खालील प्रमाणे समिती नेमणेत येत आहे.

| अ.क्र | सदस्य यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | उदय आनंदा धातुंडे | मा. महापौर |
| २ | अनिल देवकरण डाळ्या | मा. उपमहापौर |
| ३ | विठ्ठल पुंडलिक चोपडे | मा. सभागृह नेते |
| ४ | उदयसिंग मारुती पाटील | मा. विरोधीपक्ष नेते |
| ५ | सुशमा शिंदे | मा. अति. आयुक्त |
| ६ | रवि साहेब रजपुते | मा. सदस्य |
| ७ | नंदु परळकर | मा. उपायुक्त |
| ८ | प्रशांत भोसले | सहा. संचालक नगररचना |
| ९ | अनिल सुतार | सर्व्हेअर |

वरील समितीने कागल, जयसिंगपुर व कोल्हापुर येथे झोपडपट्टीतील नागरीकांना देणेत आलेल्या प्रॉपर्टी कार्ड प्रक्रीयेबाबत सविस्तर अभ्यास करुन समितीचा अहवाल मा. महासभेसमोर सादर करावा.

सूचक : र. सा. रजपुते.

अनुमोदक : वि. पुं. चोपडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३३
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २२ : इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील तयार करणेत आलेली तथापि निविदा प्रक्रिया न झालेली डिसेंबर २०२५ अखेरची जुनी अंदाजपत्रके रद्द करणे.

**ठराव**

सदरबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव वाचणेत आला.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील तयार करणेत आलेली तथापि निविदा प्रक्रिया न झालेली डिसेंबर २०२५ अखेरची जुनी अंदाजपत्रके रद्द करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : सौ. [illegible] सातपुते

अनुमोदक : र. सा. रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ ठराव क्र. ३४
सर्वसाधारण सभा दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २३ : मा. खा. धैर्यशिल माने यांचे माध्यमातुन व मा. रविंद्र माने, शिक्षण समिती सदस्य यांनी केले मागणीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील शैक्षणीक गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आधारित शिक्षण उपलब्ध करुन देणेसाठी डिजीटल सुविधा उपलब्ध होणेसाठीचा प्रस्ताव मा. शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणेबाबत मा. शिक्षण समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

मा.रवींद्र माने शिक्षण समिती सदस्य यांचे लेखी पत्रानुसार व मा.खासदार धैर्यशील माने यांच्या पुढाकाराने इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शाळांचे डिजिटलायझेशन करणे अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या काळात डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची समज वाढण्यास, अध्यापन अधिक प्रभावी होण्यास आणि स्पर्धात्मक कौशल्ये विकसित होण्यास मोठी मदत होत आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये खालील सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत मा. शिक्षण समितीने केलेली शिफारस वाचणेत आली.

स्मार्ट क्लासरूम (Interactive Board / Projector)
संगणक लॅब व इंटरनेट सुविधा
ई-लर्निंग सॉफ्टवेअर व डिजिटल कंटेंट
शिक्षकांसाठी डिजिटल प्रशिक्षण कार्यक्रम
विद्यार्थ्यांसाठी टॅब / डिजिटल साधने (आवश्यकतेनुसार)
शाळांमध्ये CCTV व डिजिटल उपस्थिती प्रणाली

तसेच नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई कार्यासन नवी-१६ यांच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे नगरपरिषदेला डिजिटल स्कूल योजनेसाठी वैशिष्ट्यपूर्ण निधीतून रुपये १,००,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी फक्त) निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी एकूण अंदाजित खर्च रुपये १०,००,००,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी फक्त) इतका अपेक्षित असून उर्वरित रुपये ९,००,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ कोटी फक्त) इतका निधी वैशिष्ट्यपूर्ण निधीतून उपलब्ध करून देण्यासाठी खालिल शाळांचा नुतनीकरण आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून देणेचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|
| १ | आनंदीबाई कर्वे विद्या मंदिर क्र.१० | १,७२,७३,७००/- |
| २ | शाहीर अमर शेख विद्या मंदिर क्र.५६ | १,०५,८७,७७५/- |
| ३ | हु.बाबु गेणू विद्या मंदिर क्र.२८ | २,२०,१४,९८३/- |
| ४ | जय भवानी विद्या मंदिर क्र.११ | १,५५,२९,०५८/- |
| ५ | राजीव गांधी विद्या मंदिर क्र.५५ | १,०८,०५,४३३/- |
| ६ | हु.अब्दुल हमिद विद्या मंदिर क्र.१४ | १,१४,७८,८४१/- |

तरी वरील प्रमाणे इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी व विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी नमूद शाळांचा नुतनीकरण आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्याचा तसेच उर्वरित रुपये ९ कोटी निधी वैशिष्ट्यपूर्ण निधीतून उपलब्ध करून देण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पुन्हा सादर करण्यास मा. महासभेची मंजुरी देण्यात येत आहे.

सूचक : - वि. पुं. चोपडे अनुमोदक : स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३५
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २४ : हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरीक लोककल्याण अभियान अंतर्गत उपलब्ध निधीपैकी ५० % निधी मराठी शाळांच्या दर्जा उन्नतीसाठी शासन निर्णयानुसार आवश्यक ती कामे करणेस मंजुरी मिळणेबाबत मा. शिक्षण समितीने केलेली शिफारस.

**ठराव**

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकिर्ण १६-नवि/१२.क्र.प्र/२०२६-, दि. २३ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरिक लोककल्याण अभियान अंतर्गत उपलब्ध निधीपैकी ५० % निधी हा मराठी शाळांच्या दर्जोन्नतीसाठी खर्च करणे आवश्यक आहे

" त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने व शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीच्या अनुषंगाने आवश्यक असलेली कामे शासन निर्णयातील तरतुदींनुसार व प्रचलित नियमांनुसार निश्चित करून राबविणे गरजेचे आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक ती कामे निश्चित करून त्यासाठी उपलब्ध निधीपैकी 50 % निधी खर्च करणेबाबत शिक्षण समिती ठराव क्र. १४ दि. १५/०४/२०२६ नुसार मा. महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी शिक्षण समितीचे शिफारसीनुसार हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरीक लोककल्याण अभियान अंतर्गत उपलब्ध निधीपैकी ५० % निधी मराठी शाळांच्या दर्जा उन्नतीसाठी खालिल शाळांचा प्रस्ताव सादर करणेत यावा.

| अ.क्र. | प्रस्ताव |
|---|---|
| १ | कै.वेणुताई यशवंतराव चव्हाण, २) वि.मं. क्र.५४ |
| २ | कै.पी.बी.सुभेदारकाका वि.मं. क्र.४८, |
| ३ | हु.बाबु गेणू वि.मं. क्र.२८, |
| ४ | राणी लक्ष्मीबाई वि.मं. क्र.१३ , |
| ५ | डॉ.सरोजिनी वि.मं. क्र.४३ |

हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरीक लोककल्याण अभियानाच्या दि. २३ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयामध्ये मराठी शाळांच्या दर्जा उन्नतीसोबतच आरोग्य विषयक सुविधा विशेषत: महीला आरोग्यासाठी उत्तम सुविधा उपलब्ध करणे, पर्यावरण व नागरी स्वच्छता, पर्यटन विकास यांचाही समावेश असलेने शासन निर्णयातील नमूद योजनांनुसार आरोग्य विषयक सुविधा व पर्यावरण तसेच पर्यटना विषयीचे खालिल प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत यावेत.

**आरोग्य विषयक सुविधा ( विशेषत: महीला आरोग्यासाठी )**

| अ.क्र. | प्रस्ताव |
|---|---|
| १ | इचलकरंजी शहराच्या विविध १० ठिकाणी हिरकणी कक्ष उभारणे. |
| २ | प्रसुतीपुर्व गरोदर महीलांना पोषण आहार किट व प्रसुती पश्चात बेबी किट देणे. |
| ३ | वैद्यकीय साहित्य, लॅब मटेरियल व वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करुन देणे. |
| ४ | सॅनिटरी नॅपकीन वेंडींग व डिस्पोजिबल मशिन सोबत इनसेरिनेटर , सॅनिटरी नॅपकीन, ब्रेस्ट कॅन्सर,सर्व्हायकल कॅन्सर, आयईसी, लैंगिक अत्याचार प्रतिबंधक आयईसी. |
| ५ | सार्वजनिक ठिकाणी आर.ओ. वॉटर फिल्टर व पाणपोई (स्टँड व मटक्यासहीत) |
| ६ | लसीकरण मोहीम व आरोग्य शिबिरांसाठी शिबिरांच्या ठिकाणी टेबल, प्लॅस्टीक चेअर. |

**पर्यावरण तसेच पर्यटना विषयी सुविधा**

| अ.क्र. | प्रस्ताव |
|---|---|
| १ | पर्यटकांना शहराचा इतिहास समजण्यासाठी मार्गदर्शक नकाशा आणि फलकांसह पंचगंगा नदीघाट परिसरामध्ये हेरीटेज वॉक मार्ग विकसित करणे. |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | प्रस्ताव |
|---|---|
| २ | पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी डिजिटल माहीती केंद्र आणि स्थानिक इतिहास, कला आणि संस्कृती दर्शविणारे छोटे संग्रहालय किंवा आर्ट गॅलरी सुरु करणे. |
| ३ | स्थानिक कलाकारांना कला सादर करण्यासाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार कट्टा विकसित करणे. |
| ४ | शहराचे विहंगम दृश्य दिसणा-या ठिकाणी सुरक्षित व्हु पॉईंट आणि पर्यटकांना आकर्षित करणारे सेल्फी पॉईंट तयार करणे. |
| ५ | पर्यटन स्थळांच्या ठिकाणी फिरण्यासाठी ई सायकल किंवा इलेक्ट्रीक बस सेवा पुरविणे. |

सूचक : वि. कृ. चोपडे

अनुमोदक : स. ब. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३६
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. २५ : नेहरु नगर येथील पडसर घरे, दुकानगाळे यांची ऑनलाईन व घरफाळा रजिस्टरला नोंदणी करुन घरफाळा भरुन घेणेबाबत रवि साहेब रजपुते, सदस्य यांनी दि. १६/०२/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

## ठराव

मा. नगरसेवक श्री रवि साहेब रजपुते यांचा दि. १६/०२/२०२६ रोजीचा इचलकरंजी महानगरपलिका महापौर कार्यालय कडील आवक क्र. २३ दि. १६/०२/२०२६ रोजीचे अर्जान्वये नेहरुनगर पडसर घरे/दुकानगाळे यांची ऑनलाईन व रजिस्टर घरफाळा नोंदणी होऊन मिळणेबाबत पत्राद्वारे मागणी केलेली आहे.

इचलकरंजी महानगरपलिका मूल्य निर्धारण व कर संकलन विभागाकडून शहरातील मालमत्ता कर आकारणी महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८ अ मधील तरतुदीनुसार करणेत येते.

मा. नगरसेवक श्री रवि साहेब रजपुते यांनी मागणी केलेली मिळकती ह्या प्रशासकीय वॉर्ड क्र. ११ मधील इचलकरंजी महानगरपलिका नेहरुनगर परिसरमध्ये समाविष्ठ होतात. सदर झोपडपट्टी धारकांची तत्कालीन नगरपरिषद असताना जे नोंदणीकृत झोपडपट्टीधारक आहेत यांच्या मिळकतीची नोंद महानगरपालिका कडील मालमत्ता व्यवस्थापन (मिळकत विभाग) यांचेकडील मान्यतेनंतरच इकडील कर विभागाकडे कर आकारणी करणेत येते.

त्यानुसार नेहरुनगर झोपडपट्टी मधील नोंदणीकृत झोपडपट्टीधारकांना मालमत्ता कर आकारणेत आलेला आहे, व अश्या नोंदणीकृत झोपडपट्टी धारकांची कर आकारणी करणेत आलेली आहे. मा. सदस्य श्री रवि साहेब रजपुते यांनी दिले प्रस्तावाबाबत नेहरू नगर मधील पडसर घरे व दुकान गाळे यांचे पूर्ववत ऑनलाईन व रजिस्टर घरफाळा नोंदणी करून घेणेबाबत मा. महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय होणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी नेहरु नगर येथील पडसर घरे, दुकाणगाळे यांची घरफाळा रजीस्टरला नोंदणी करणेकामी सदर नोंदणी करणेत येणारे नागरीक / दुकाणदार यांचेकडुन नेहरु नगर झोपडपट्टी येथे भविष्यात मा. शासन किंवा महानगरपालिका यांचे मार्फत घरकुल योजना अथवा अन्य तत्सम योजना राबविणेचे निश्चित झालेस त्यावेळी योजनेसाठी सदर भुखंडातील लागणारी जागा सर्वांबरोबर रिकामी करुन सदरचा घरफाळा रद्द करणेचे अटीवर सद्याच्या वहिवाटीस अनुसरुन घरफाळा रजिस्टरला नाव नोंद करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच यांच्याच प्रमाणे IHSDP योजने अंतर्गत नविन घरकुल योजनेसाठी पात्र असलेले पात्र घरकुलधारक हे आपली जागा रिकामी करुन थोरात चौक येथील न.प. मालकीच्या व्यापारी दुकानगाळ्यांमध्ये व इतर ठिकाणी स्थलांतरीत झाली होती. योजनेचे काम प्रलंबील राहिलेने सदरचे जे पात्र लाभार्थी पुन्हा सदर ठिकाणी वास्तव्यास आले आहेत त्यांना देखील वरील प्रमाणे सदर भुखंडातील लागणारी जागा सर्वांबरोबर रिकामी करुन सदरचा घरफाळा रद्द करणेचे अटीवर सद्याच्या वहिवाटीस अनुसरुन घरफाळा रजिस्टरला नाव नोंद करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] र. सा. रजपुते.

अनुमोदक : [signature] वि. पुं. चोपडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

ठराव क्र. ३७
दि. ३०/०४/२०२६

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

विषय क्र. २६ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील घनकचरा उठाव आणि प्रक्रियेसंबंधात आवश्यक असणारी वाहने स्वच्छ भारत मिशन अथवा अन्य तत्सम योजनेतुन महानगरपालिकेस मिळावित यासाठी मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील घनकचरा उठाव आणि प्रक्रियेसंबंधात आवश्यक असणारी वाहने स्वच्छ भारत मिशन अथवा अन्य तत्सम योजनेतुन महानगरपालिकेस मिळावित यासाठी मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी मागणी केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने संकलन, वाहतूक व प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. सद्यस्थितीत उपलब्ध वाहनसामग्री अपुरी पडत असून, कचरा उठाव कार्यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या Swachh Bharat Mission तसेच इतर समांतर योजनांच्या माध्यमातून महानगरपालिकेस आवश्यक यंत्रसामग्री व वाहने उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिकेकडून शासनाकडे आवश्यक वाहनांसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावामध्ये खालीलप्रमाणे वाहनांची मागणी करण्यात आलेली आहे :

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक प्रमाण |
|---|---|---|
| १. | थ्री व्हीलर ऑटो टिप्पर | २० नग |
| २. | फोर व्हीलर ऑटो टिप्पर | १० नग |
| ३. | रिफ्युज कॉम्पॅक्टर | ०५ नग |

वरील वाहनांची उपलब्धता झाल्यास शहरातील घरगुती, व्यावसायिक व सार्वजनिक ठिकाणांवरील कचरा संकलन अधिक कार्यक्षमतेने करता येईल. तसेच कचरा वाहतुकीत सुसूत्रता येऊन प्रक्रिया केंद्रापर्यंत कचऱ्याची विलंब न होता वाहतूक होईल. यामुळे स्वच्छता व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होऊन शहर स्वच्छ व आरोग्यदायी राहण्यास मदत होईल असा प्रस्ताव कार्यालयाने सादर केला आहे.

तरी शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी आवश्यक पाठपुरावा प्रशासनाने करावा.

सूचक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

अनुमोदक : [signature] स. व. मुल्लीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३८
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २७ : महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांचे अधिकृत सरकारमान्य शिवचरित्र प्रसिद्ध करावे यासाठी श्री गुरुनाथ म्हातुकडे यांनी केले मागणीनुसार महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करणे बाबत.

**ठराव**

वृत्तपत्र लेखक श्री गुरुनाथ म्हातुकडे यांनी दि. १९/०२/२०२६ रोजी इचलकरंजी महानगरपालिकेचे महापौर मा. उदय धातुंडे यांना पत्राद्वारे सरकारमान्य शिवचरित्र महाराष्ट्र सरकारने लिहीणेबाबत महासभेत ठराव करून तो ठराव महाराष्ट्र सरकारकडे पाठविणेबाबत विनंती केली आहे.

सदर पत्रामध्ये श्री गुरुनाथ म्हातुकडे यांनी महाराष्ट्र सरकारने सरकारमान्य शिवचरित्र लिहावे याबाबत महासभेत ठराव करून त्या ठरावावर वेगवेगळ्या सदस्यांनी मत व्यक्त करून तो ठराव महाराष्ट्र सरकारकडे पाठवावा. छ. शिवाजी महाराज यांचेवर लिहिताना, बोलताना सरकारी चरित्रांचा आधार घेवूनच मांडणी करावी लागेल अशी मागणी केली आहे.

तरी वृत्तपत्र लेखक श्री गुरुनाथ म्हातुकडे यांचे मागणीनुसार सरकारमान्य शिवचरित्र लिहिणेबाबत मा. महाराष्ट्र शासनाकडे सदर ठरावानुसार शिफारस करणेत येत आहे.

सूचक : र. सा. रजपुते

अनुमोदक : सौ. रु. अ. सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ३९
दि. ३०/०३/२०२६

विषय क्र. २८ : घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सुरु असलेल्या विविध कामांचे मक्तेदार यांचे कडुन समाधानकारक रित्या काम होत नसलेने व काही कामे अपुर्ण / प्रलंबित असलेने घनकचरा व्यवस्थापनाचे उद्धीष्ट पुर्ण होत नसल्याने संबंधीत मक्तेदार कंपनी यांनी निविदेतील अटी / शर्तीचं उल्लंघन केले असलेने सदर मक्ता तातडीने रद्द करुन नव्याने निवीदा प्रक्रीया राबविणेबाबत श्री. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांनी दि. १३/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

## ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेच्या धनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत खालील कामे विविध मक्तेदारांना कार्यदेशाद्वारे देण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मक्तेदार नाव |
|---|---|---|
| १ | Development /Installation of Municipal Solid Waste Processing Machineries, Installation of RDF plant of 65TPD and SWM Processing plant of 150 TPD and Operation & maintenance for a period of 5 years at R.S. No 638 at R.S. No 638 kachara depo. sangli road, Ichalkarnji. | आदर्श भारत इन्व्हायरो प्रा.लि.पुणे |
| २ | O & M of Bio Methenation plant of Capacity 5 TDP at MSW processing site R.S. No. 638 Sangli Naka, Ichalkaranji. | जे. के. इंजीनियर्स, पुणे |
| ३ | Scientific Dumpsite Land Reclamation through Bio-mining, Resource Recovery and Scientific Rejects Disposal at Solid Waste Dumping Ground situated at R.S.638, takwade Munici road, near Sangli naka Ichalkaran | आदर्श भारत इन्व्हायरो प्रा.लि.पुणे |

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून मा. सभापती - स्थायी समिती यांच्या पत्रानुसार धनकचरा व्यवस्थापन अंतर्गत वरील कामांचे मक्ते रद्द करून नविन निविदा प्रक्रिया राबविणेबाबतची मागणी केली आहे.

मा. सभापती, स्थायी समिती यांनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणी व आढाव्यानुसार, घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत सुरू असलेल्या कामांबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. सद्यस्थितीत संबंधित मक्तेदाराकडून होत असलेले काम समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कचरा व्यवस्थापनाचे उद्दिष्ट पूर्ण होत नसल्यामुळे शहरात पर्यावरणीय समस्या आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मा. सभापतींच्या सूचनेनुसार संबंधित मक्तेदाराचा मक्ता (Contract) तातडीने रद्द करण्यात यावा. सदर कामासाठी नवीन निविदा प्रक्रिया (New Tender Process) त्वरित राबविण्यात यावी, जेणेकरून काम योग्य दर्जासह वेळेत पूर्ण होईल. असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सुरु असलेल्या वरील नमुद तीन कामांचे मक्तेदार यांचे कडुन समाधानकारक रित्या काम होत नसलेने व काही कामे अपुर्ण / प्रलंबित असलेने घनकचरा व्यवस्थापनाचे उद्धीष्ट पुर्ण होत नसल्याने व संबंधीत मक्तेदार कंपनी यांनी निविदेतील अटी / शर्तीचे उल्लंघन केले असलेने सदर तीन ही कामांचा मक्ता रद्द करणेत येत असुन सदर कामी नव्याने अंदाजपत्रक तयार करुन नव्याने निविदा प्रक्रीया राबविणेत यावी.

सूचक : सतिश वसंतराव मुळीक

अनुमोदक : विठ्ठल पुंडलिक चोपडे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ | ठराव क्र. ४०
सर्वसाधारण सभा | दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. २९ : मयत व्यक्तींचे दहन / दफन विधीसाठी मयत व्यक्तीचे नातेवाईकांना देणेत येणारा दहन / दफन निधी बंद केला असलेने सदरचा दहन / दफन निधी देणेबाबत सुशांत बाळासाहेब कलागते, सदस्य व इतर यांनी मागणी केले कामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

## ठराव

उमाकांत जयश्री नानचंद दाभोळे उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी (पश्चिम) यांनी मृत व्यक्तींच्या दफन विधीसाठी बंद केलेले सानुग्रह अनुदान र. रु. ३०००/- इतके चालु करणे बाबत दि. १६/०२/२०२६ रोजी निवेदन दिलेले आहे, तसेच मा. सुशांत बाळासो कलागते नगरसेवक, इचलकरंजी महानगरपालीका, इचलकरंजी यांनी इचलकरंजी महानगरपालीका क्षेत्रातील मयत होणा-या नागरीकांच्या वारसांना बंद करण्यात आलेली मयत निधी चालु करून मयताच्या वारसांना र.रू.४०००/- देण्यात यावी, अशी मागणी केलेली आहे.

मयताचे मदत निधी मागणीसाठी सरसकट मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत असतात.त्यामुळे महानगरपालीकेवर आर्थिक खर्चाचा बोजा मोठ्या प्रमाणात वाढत जात आहे. त्यामुळे महानगरपालीकेच्या खर्चात बचत होण्याच्या दृष्टीने मयत व्यक्तीचे, वारसदाराचे नांव दारिद्र्य रेषेखालील (BPL) यादीमध्ये नोंद असेल अशा गरजु नागरीकांना र. रू. ३०००/- प्रमाणे रक्कम वारसाचे बँक खातेवर म.न.पा.कडुन RTGS ने जमा करणेत यावेत असा सुधारीत दुरूस्तीस मंजूरी मे. प्र. ठ. क्र. ६/२०२३ दि.२७/०४/२०२३ रोजी करणेत आलेला आहे.

दर वर्षी किमान अंदाजे २००० इतके नागरीक मयत होत असतात. शहरात मयत होणा-या व्यक्तींच्या दहन / दफन विधीसाठी सरसकट सानुग्रह अनुदान देणेसाठी किमान र.रु. ६०,००,००० इतका खर्च येऊ शकतो. सन २०२६-२०२७ या वर्षासाठी अंदाजपत्रकामध्ये दहन / दफन निधी देणेसाठी रक्कम रू. ६०,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. महानगरपालिकेची आर्थिक बचत होणेच्या दृष्टीने काही अटी शर्ती तयार करून सदरच्या मयत निधीची मागणी बाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये रहिवासी असणाऱ्या व १ मे २०२६ रोजी नंतर मयत झालेल्या सर्व धर्मीय नागरिकांच्या कायदेशीर वारसदार यांना इचलकरंजी महानगरपालिकेत विहित नमुन्यात बारनिशि विभागाकडे अर्जाद्वारे मागणी केल्यास संबंधित मयत करिता रु. ३५०० प्रमाणे दहन / दफन निधी मयताचे वारसदार यांना देणेत यावा. मयत झालेल्या व्यक्तीच्या वारसांनी सदर निधीसाठी मयताच्या दिनांकापासुन ६० दिवसांच्या आत मागणी अर्ज करणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या मयत दहन / दफन निधी मागणीचा विचार करणेत येणार नाही. तसेच सदरचा निधी हा रोख स्वरुपात न देता मयताचे वारसदार यांच्या बँक खात्यावर जमा करणेत यावा.

सूचक : R. A. Suk.. सौ. रु. अ. घातपुते

अनुमोदक : वि. पुं. चोपडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४१
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३० : इचलकरंजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कोल्हापुर नाका, संभाजी चौक ते स्टेशन रोड रस्त्यावरील MSEB च्या विद्युत पोल वर २ X २ ची होर्डीग्ज लावणेस परवानगी देणेबाबत मा. रवि साहेब रजपुते यांनी दि. ०९/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत.

**ठराव**

उपरोक्त विषयांकित संदर्भीय अर्जदार यांनी इचलकरंजी महानगरपालिका स्थापन होऊन चार वर्ष संपत आले आहे. महापानगरलिकेला भविष्यात विकास कामे करावयाची असेल तर उत्पन्न वाढ व हद्द्वाढीवर काम करायला लागणार आहे. इचलकरंजी नगरपालिका असताना होर्डिंग मुक्त करण्या संदर्भात एकमताने ठराव झालेला आहे. उद्देश गाव होर्डिंग मुक्त करावयाचा आहे. मग गाव होर्डिंग मुक्त झाले काय ? इचलकरंजी शहरातील होर्डिंगवाल्यांना खाजगी ठिकाणचा फायदा होत नाही. उलट कोल्हापूर शहरामध्ये कोल्हापूर शहातील होर्डिंगवाल्यां व्यतिरिक्त कोणालाही होर्डिंग लावण्याची व टेंडर भरण्याची परवानगी नाही. या सगळ्या गोष्टींचा विचार करून शहरात सर्वत्र होर्डिंग लावण्याची परवानगी नको. परंतु एम.एस.ई.बी चे लाईट पोल शिवाजी पुतळा ते कोल्हापूर नाका, संभाजी चौक ते स्टेशन नका एम.एस.ई.बी च्या डंबावरती २'x२' ची होर्डिंग ची परवानगी द्यावी अशी मा. रवि साहेब रजपुते यांनी विनंती केली आहे.

याबाबत मार्केट विभागाने खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद मे.कौ.ठ.क्र.७ दि. २४/५/२०१६ ने जाहीरात बोर्ड व होर्डिंग मुळे शहराचे विद्रुपीकरण झालेने शहरातील सर्व होर्डिंगना देणेत आलेली परवानगी रद्द करून इचलकरंजी शहर होर्डिंग मुक्त करणेत आले आहे. मे. कौ.ठराव नं २७० दि. ५/२/२०१९ ने शहरातील स्वतःचे मालकीचे खाजगी जागेत यापूर्वी तत्कालीन नगरपरिषदेकडून देणेत आलेले परवाने वगळता जाहिरात करणेसाठी नव्याने परवानगी देणेत येऊ नये सदर परवानाधारक जाहिरात बोर्डाचे जागेव्यतिरिक्त अन्यत्र शहर होर्डिंग मुक्त धोरण सद्यस्थितीत कायम ठेवणेत यावे असा ठराव करण्यात आला.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका PIL १५५/२०११ मध्ये दि. १९/१२/२०२४ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने मा. अति. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली "सुधारित धोरण व कार्यपद्धती" अमलात आणण्याबाबत उपायुक्त, संबंधित विभाग प्रमुख याची समिती गठीत करून सदर समिती बैठकीमध्ये यावर चर्चा, विचार होऊन "सुधारित धोरण व कार्यपद्धती" (SOP) - २०२४ अमलात आणण्यास निश्चित झाले असल्याने त्यास मा. प्रशासक (मा. महासभा) ठराव क्र. ८९ दिनांक ३१/१२/२०२४ अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर सुधारित धोरण व कार्यपद्धती (SOP) मध्ये एम.एस.ई.बी च्या डंबावरती होर्डिंग लावण्या बाबत कोणतीही तरतूद नाही. वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला अहवाल वाचणेत आला.

तरी यापुवी मे. कौ. ठ. क्र. ७ दि. २४/०५/२०१६ नुसार इचलकरंजी शहरामध्ये जाहीरात बोर्ड व होर्डिंग लावणेस देणेत आलेली परवानगी रद्द करणेत आले बाबत झालेल्या ठरावानंतर मे. कौ.ठराव नं २७० दि. ५/२/२०१९ ने शहरातील स्वतःचे मालकीचे खाजगी जागेत यापूर्वी तत्कालीन नगरपरिषदेकडून देणेत आलेले परवाने वगळता जाहिरात करणेसाठी नव्याने परवानगी देणेत येऊ नये सदर परवानाधारक जाहिरात बोर्डाचे जागेव्यतिरिक्त अन्यत्र शहर होर्डिंग मुक्त धोरण सद्यस्थितीत कायम ठेवणेत यावे असा ठराव करण्यात आला आहे व त्यानंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका PIL १५५/२०११ मध्ये दि. १९/१२/२०२४ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने मा. प्रशासक (मा. महासभा) ठराव क्र. ८९ दिनांक ३१/१२/२०२४ नुसार सुधारित धोरण व कार्यपद्धती (SOP) निश्चित करणेत आले आहे. याप्रमाणे कौ. ठ. क्र. ७ दि. २४/०५/२०१६ यानुसार शहर होर्डिंग मुक्त ठेवणेबाबत झालेल्या ठरावानंतरही मे. कौ.ठराव नं २७० दि. ५/२/२०१९ खाजगी जागेत जाहिरात बोर्ड लावणेस परवानगी देणेत आलेली आहे

मा. प्रशासक (मा. महासभा) ठराव क्र. ८९ दिनांक ३१/१२/२०२४ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २४४, २४५ महाराष्ट्र मालमत्ता विरुपणास प्रतिबंध करणेकरीता अधिनियम १९९५, महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे व जाहिरात प्रदर्शित करणेचे नियमन आणि नियंत्रन ) नियम २०२२ च्या तरतुदी लागु असणाऱ्या जाहिरातींपैकी अनुज्ञेय करणेत आलेल्या जाहिराती वगळता नव्याने जाहिरात, होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर लावणेस प्रतिबंध करणेत आले बाबत झालेला

Scanned with OKEN Scanner

ठराव यानुसार सद्या लावणेत आलेल्या जाहिराती / होर्डिंग व सदर जाहिराती होर्डिंग यांना देणेत आलेल्या मुदतीबाबतचा सविस्तर चर्चा करणेत आली. वरील सर्व वस्तूस्थिती अवलोकनी घेता,

१. कौ. ठ. क्र. ७ दि. २४/०५/२०१६ नुसार शहर होर्डिंग मुक्त ठेवणेबाबत झालेल्या ठराव

२. कौ.ठ. क्र. २७० दि. ५/२/२०१९ खाजगी जागेत जाहिरात बोर्ड लावणेस देणेत आलेली परवानगी

३. शहरात सद्या अस्तित्वात असणारे अधिकृत / अनधिकृत होर्डिंग ची संख्या

४. परवाना धारक होर्डिंग ची मुदत संपली आहे काय ?

५. ज्या खाजगी इमारतींवर होर्डिंग लावले आहेत त्यांचा बांधकाम परवाना व पुर्णत्वाचा दाखला आहे काय ?

६. सन २०१९ - २० साठी देणेत आलेल्या होर्डिंगच्या मुदतीनंतर नुतणीकरण करणेत आले आहे का ? त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी आहे काय ?

७. मा. प्रशासक (मा. महासभा) ठराव क्र. ८९ दिनांक ३१/१२/२०२४ सुधारीत धोरण व कार्यपद्धती (SOP) निश्चित केली आहे. याबाबत सर्व सदस्यांना माहिती होणे आवश्यक आहे. यासाठी सदर सुधारीत धोरण व कार्यपद्धती (SOP) महासभेसमोर आणावी.

या अनुषंगाने वरील सर्व मुद्यांबाबत सविस्तर अहवाल पुढील सभेसमोर सादर करणेत यावा. वरील या सर्व मुद्यांसह मा. सदस्य, रवि साहेब रजपुते यांनी दि. ०९/०३/२०२६ चे पत्रानुसार विद्युत बोर्डवर २'x२' चे होर्डिंग लावणेस केलेल्या मागणीबाबत धोरण निश्चित करुन एकत्रित निर्णय करणेत यावा.

सूचक :

अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४२
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३१ : इचलकरंजी शहरातील विविध नाक्यांवर स्वागत कमान बांधकाम व दुरुस्ती बाबत श्री. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांनी दि. ०८/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत.

**ठराव**

इचलकरंजी शहरामध्ये प्रवेश करणाऱ्या मुख्य रस्त्यावर स्वागत कमानी उभा करणेबाबत सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती व फहिम पाथरवट, शहर उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा यांनी मागणी केली आहे. शहरामध्ये नदीवेस नाका, कबनूर नाका, सांगली नाका, स्टेशन रोड नाका या ठिकाणी स्वागत कमान उभा करता येऊ शकते.

जिल्हा नियोजन समिती कार्यालय, कोल्हापुर यांचे दि. २६/११/२०२५ चे पत्रानुसार प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत शिवतिर्थ टप्पा क्रं.०२ /व स्वागत कमानी उभारणे एकूण खर्च र.रू. ३२ कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना प्राप्त झाली आहे.

कामासाठी प्रकल्प तयार करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करून सविस्तर प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही सद्या सुरु आहे.

सदरकामी सविस्तर अहवाल प्राप्त होताच निधी उपलब्धतेकरीता मा.शासनाकडे सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करून निधी उपलब्ध होताच स्वागत कमान उभारणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शिवतिर्थ टप्पा क्र. २ व शहरातील वरील प्रमाणे नमुद ठिकाणी स्वागत कमान उभारणेसाठी निधी प्राप्त होणेसाठी प्रशासनामार्फत कार्यवाही करणेत यावी.

सूचक : Satish स. व. मुळीक

अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ | ठराव क्र. ४३
सर्वसाधारण सभा | दि. ३०/०४/२०२६

विषय क्र.३२ : वस्त्रोद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी पंतप्रधान आवास योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाशिवाय अतिरिक्त एक लाख रुपये अनुदान महाराष्ट्र शासनाकडून मिळावे यासाठी शासनाकडे मागणी करणेबाबत.

**ठराव**

उपरोक्त विषयास अनुसरून आम्ही आपणास सविनय सादर करतो कि , संदर्भीय क्र १ इचलकरंजी महानगरपालिका सर्वसाधारण सभा कार्यक्रम पत्रिकेमध्ये ‘ इचलकरंजी शहरात वस्त्रोद्योग क्षेत्रात कामा करणा-या कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेतून मिळणा-या अनुदानाशिवाय अतिरिक्त एक लाख रुपये अनुदान महाराष्ट्र शासनाकडून मिळणेबाबत शासनाकडे मागणी करणेबाबत’ हा विषय अंतर्भूत केला आहे.

सद्यस्थितीत संदर्भ क्र. २ नुसार केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना २.० ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून सदर शासननिर्णयामध्ये मुद्दा क्र ६( पृष्ठ क्र ५) ‘योजनेंतर्गत घटक निहाय लाभ अनुदान’ मध्ये घटक क्र १ वैयक्तिक लाभार्थी अनुदान (BLC) व घटक क्र २ परवडणा-या दरातील घरकुले साठी केंद्र शासनाचे १.५ लक्ष रुपये व राज्य शासनाचे १ लक्ष रुपये असे एकूण २.५ लाख रु चे अनुदान प्रती लाभार्थी वितरीत करणेबाबत स्पष्टता दिली आहे.

सदर शासननिर्णयामध्ये योजनेतून मिळणा-या २.५ लाख रु अनुदानाशिवाय कोणत्याही समाजघटकांसाठी अतिरिक्त अनुदान देणेबाबत नमूद करणेत आलेले नाही .

उपनिर्देशित शासन निर्णयामधील तरतुदींचे अवलोकन केले असता सद्यस्थितीत वस्त्रोद्योग क्षेत्रात काम करणा-या कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेतून मिळणा-या अनुदानाशिवाय अतिरिक्त एक लाख रुपये अनुदान मिळणेसाठी महाराष्ट्र शासनाकडून मान्यता घेणे हि शासनस्तरावरील धोरणात्मक बाब असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी वस्त्रोद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी पंतप्रधान आवास योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाशिवाय अतिरिक्त एक लाख रुपये अनुदान महाराष्ट्र शासनाकडून मिळावे यासाठी मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : R. A. Sub... सौ. रु. अ. सातपुते

अनुमोदक : [signature] र. सा. रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४४
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३३ : महापालिकेच्या मालकीचे जुना वॉर्ड नंबर १० साईट नंबर ९४ श्री काळा मारुती मंदिर देवालया नजीक असणारे जुने सांस्कृतिक केंद्र निर्लेखित करणेकामी श्री काळा मारुती आरती भक्त मंडळ यांचे कडून आले अर्जाचा विचार करुन निर्णय घेणे.

**ठराव**

विषयांकित कामी इचलकरंजी महानगरपालिका मालकीचे वॉर्ड नं.१० मधील साईट नं.९४ अंतर्गत काळा मारुती मंदीर नजीक, इंदिरा गांधी रुग्णालय परीसर नजीकची सभामंडप इमारत RCC Framed स्वरूपाची आहे.

उपरोक्त इमारत अंदाजे ४० वर्षापूर्वी बांधण्यात आलेली आहे. सदर सभा मंडप हा जुना व नादुरूस्त स्थितीत आहे. सद्यस्थितीत सदर सांस्कृतिक केंद्र इमारतीला भेगा पडल्या आहेत. तसेच स्लॅबला गळती लागली आहे. स्लॅबला केलेले प्लास्टर निघाले आहे.

सदर ठिकाणी नेहमीच नागरीकांची वर्दळ असते. नागरीकांची जिवितहानी होऊ नये म्हणून सभामंडप विस्तारीकरण करताना अस्तित्वातील सभामंडप पाडूनच नविन सभामंडप उभारता येणार आहे. त्यामुळे सदर सभामंडप निर्लेखित करून नविन सभामंडप उभारणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार जुना वॉर्ड नंबर १० साईट नंबर ९४ श्री काळा मारुती मंदिर देवालया नजीक असणारे जुने सांस्कृतिक केंद्र निर्लेखित करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : र. ला. रजपुते

अनुमोदक : R. A. Sub... सौ. ऊ. अ. सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४५
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३४ : प्र.क्र. १२ पारिख कॉलनी परिसर गल्ली नं. १,२,३ मंजुर गटर राजमाता चौक, निता शिंदे यांचे गल्लीत करणेबाबत सौ. सुरेखा अजितमामा जाधव यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

प्र. क्र. १२ पारिख कॉलनी परिसर गल्ली नं. १,२,३ गटर मंजुर आहे. परंतु सदर ठिकाणच्या गटरी सुस्थितीत असलेने सदरची मंजुर गटर पुजारी मळा, राजमाता चौक येथे निता शिंदे यांचे गल्लीत करणेबाबत सौ. सुरेखा अजितमामा जाधव, नगरसेविका यांनी दि. २०/०३/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

तरी सदरचा विषय नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : म. शि. हिंगमिरे

अनुमोदक : यो. पो. पारिख

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४६
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३५ : प्र.क्र. १४ षटकोण चौक येथील सार्वजनिक शौचालया लगत असलेली मोकळी जागा सदर चौकामध्ये मागील ३० ते ३५ वर्षांपासुन व्यवसाय करणारे पान टपरी, हॉटेल, केशकर्तनालय, सायकल दुकान यांना चार फुट बाय चार फुट या प्रमाणे भाडेतत्वावर देणेबाबत सौ. मेघा शहाजी भोसले, सदस्या यांनी दि. २०/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणेसाठी प्रभाग क्र. १४ मधील षटकोन चौक येथील सार्वजनिक शौचालय शेजारील, लायकर मळा रस्त्यालगतअसलेल्या १२ X ४५ फूट रुंद मोकळ्या जागेमध्ये पान टपरी, हॉटेल, केशकर्तनालय व सायकल दुकानासाठी महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे डिपॉझीट व भाडेतत्वावर देणेबाबत सन्मानिय सदस्या मा. सौ. मेघा शहाजी भोसले यांनी दि. २०-०४-२०२६ रोजीच्या पत्रानुसार मागणी केली आहे.

सदर पत्रामध्ये मा. सदस्या यांनी महानगरपालिकेच्या मालकीची सि. स. नं. १५१९५ टि. पी. स्कीम नं. ५८० अ मधील जागा सार्वजनिक शौचालय वापराकरिता राखीव होती. सदर ठिकाणी ७२ सिटर शौचालयासाठी ०२ शौचालय अस्तित्वात होते. परंतू सदरची शौचालय इमारत पडलेली आहे व २४ सिटर पे अॅण्ड युज शौचालय इमारत बांधणेत आली आहे. सदर शौचालय शेजारील अतिरिक्त मोकळी जागा अंदाजे ४ फूट बाय १५ फूट अशी असुन, षटकोन चौक येथील रस्त्यावरील जागेवर गेल्या ३० ते ३५ वर्षापासून पान टपरी, हॉटेल, केशकर्तनालय व सायकल दुकाने आहेत. सदर दुकानांना महानगनगरपालिकेच्या नियाप्रमाणे डिपॉझीट व भाडेतत्वावर जागा दिल्यास महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. व षटकोन चौकातील वर्दळीची जाग अतिक्रमण विरहीत होवून सदरचा रस्ताही रुंद होईल असे नमुद करुन मा. सदस्या यांनी सदरचा प्रस्ताव हा महासभेमध्ये घेणेत यावा अशी विनंती केली आहे. सदर जागेवरील आरक्षणा बाबत आणि भाडे भट्ट्याने जागा देणे बाबत सहा. संचालकसो नगररचना विभाग यांचा अभिप्राय मिळणेकामी सादर केला असता सहा. संचालक नगररचना यांनी मंजुर विकास योजनेनुसार उक्त आरक्षणामध्ये सदर वापर अनुज्ञेय होत नाही. तथापि सदर वापर प्रारुप विकास योजना मंजुर झालेनंतर भागशः करता येईल असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने व अतिक्रमण विरहित व रहदारीस अडथळा होणार नसलेने सहा. संचालक नगररचना यांचे अभिप्रायानुसार प्रारुप विकास योजना मंजुर झालेनंतर महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार जागा भाडेतत्वावर देणेकरीता मिळकत विभाग यांचे मार्फत पुढील कार्यवाही करणेत यावी.

सूचक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

अनुमोदक : Satish स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४७
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३६ : षटकोन चौक येथे महावितरण कंपनीचे अ व ब उपविभागाचे डी. पी. पोल हे जुना चंदुर रोड व कुडचे मळा परिसरातील रस्त्यावरच असल्याने सदर रस्त्यांवरुन वाहतुकीस अडथळा निर्माण होत असलेने व सदर डी. पी. पोल च्या ठिकाणी नागरीक मोठया प्रमाणात कचरा टाकत असलेने सदरचे डी. पी. पोल शिफट करणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत सौ. मेघा शहाजी भोसले, सदस्या यांनी दि. २०/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

## ठराव

षटकोन चौक येथे महावितरण कंपनीचे अ व ब उपविभागाचे DP पोल हे जुना चंदूर रोड व कुडचे मळा परीसरातील रस्त्यावरच असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने सदर DP शिफ्ट होणे कामी मा.नगरसेविका सौ.मेघा शहाजी भोसले यांनी केले मागणीस अनुसरून दि. ३०/०४/२०२६ रोजी होणाऱ्या महासभेमध्ये विषय क्र.३६ घेणेत आलेला आहे. त्यास अनुसरून प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी केली असता सदरचे DP पोल हे येथे असणाऱ्या सार्वजनिक शौचालया लगत फुटपाथवर असल्याचे निदर्शनास आले आहे. मा.नगरसेविका सौ.मेघा शहाजी भोसले यांनी मागणी केलेप्रमाणे सदरचे DP पोल शौचालयाच्या जागेमध्ये स्थलांतरित करणेबाबत सुचविले आहे.

यानुसार शौचालयाच्या जागेमध्ये असणारे विकास आराखडामधील आरक्षण व या जागेमध्ये मा नगरसेविका सौ.मेघा शहाजी भोसले यांनी मागणी केलेप्रमाणे कामाचे प्रयोजन करता येईल का? या बाबत नगररचना विभागामार्फत अभिप्राय घेणे आवश्यक वाटत असलेबाबत विद्युत अभियंता यांनी नमुद केले आहे.

विद्युत अभियंता यांचे अभिप्रायानुसार सहा. संचालक नगररचना यांनी षटकोन चौक येथील विद्यमान रस्त्यामध्ये असनारा DP पोल लगतच्या सार्वजनिक शौचालयाच्या जागेमध्ये स्थलांतरीत करणेसाठी मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील विनियम क्र. ४.२७ (२) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार सदर वापर अनुज्ञेय होईल अशी शिफारस केली आहे.

तसेच सदरचा DP पोल स्थलांतरीत करणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी यांनी अंदाजपत्रक तयार करुन देणेबाबत मा. खा. धैर्यशील माने यांनी दिले पत्रानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीने र. रु. १६,११,४४१/- चे अंदाजपत्रक तयार करुन दिले आहे.

तरी वरील प्रमाणे विद्युत अभियंता यांचा प्रस्ताव व सहा. संचालक नगररचना यांचे शिफारसीनुसार षटकोन चौक येथील विद्यमान रस्त्यामध्ये असणारा DP पोल लगतच्या सार्वजनिक शौचालयाच्या जागेमध्ये स्थलांतरित करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदरचा DP पोल स्तलांतरीत करणेकामी जिल्हा नियोजन आणि विकास समिती अंतर्गत उपलब्ध निधीमधुन करणेसाठी प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन व विकास समितीकडे सादर करणेत यावा.

तसेच मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती स्थायी समिती यांनी प्र. क्र. ५ जवाहर नगर परीसरातील मरगुबाई मंदीर, आदर्श झोपडपट्टी, कोल्हापुर बेकरी जवळ व बलवान वाळु डेपो जवळील DP पोल स्थलांतरीत करणेबाबत मागणी केली आहे. व मा. संतोष बाबुराव शेळके, सदस्य यांनी छत्रपती संभाजी महाराज चौक येथे सिग्नल व्यवस्था बसविणेत येणार असलेने तेथील महावितरण कंपनीचे अ व ब विभागाचे DP पोल सदर ठिकाणाहुन १५० फुट अंतरावर स्थलांतरीत करणेची मागणी केली आहे. तसेच रवि साहेब रजपुते यांनी प्रभग क्र. १० विलास मामा गाताडे यांचे घरासमोरील ट्रांन्सफॉर्मरची जागा बदलणेची मागणी केली आहे. सदर मा. सदस्य यांचे मागणीबाबत आवश्यक प्रस्ताव कार्यालयाने लगतच्या मा. महासभेसमोर सादर करावा.

सूचक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे    अनुमोदक : Satish स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४८
दि. ३०/०४/२०२६

विषय क्र. ३७ : इचलकरंजी महानगरपालिका उद्यानामध्ये नविन इलेक्ट्रीकलब मॅकेनिझम एम्युझमेंट झोन बि. ओ. टी. तत्वावर सुरु करणेस मिळणेबाबत शिवसाई एन्टरप्राइजेस यांनी दि. २०/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली असुन याबाबत उद्यान विभागाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

वरील संदर्भीय क्र.१ पत्रान्वये श्री.शिवलाई इंटरप्राईजेस यांनी amusement zone बनवून त्याची देखभाल व देखरेख तसेच लाईट बिल आम्ही स्वत: भरण्यास तयार आहोत तरी त्यासाठी सर्व सामान्य तिकीट दर १०,२०,३० रुपये इतकी फी आकारणेस हरकत नसावी. तरी या पासून महापालिकेला उत्पन्न वाढीसाठी B.O.T. तत्वावर अटी शर्ती घालून महापालिकेच्या नियमावलीना तयार करून शहीद भगतसिंग उद्यान येथे नविन electrical mechanism amusement zone B.O.T. तत्वावर देणेबाबत अर्ज प्राप्त झालेला आहे.

उद्यान पर्यवेक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, सदर उद्यानामध्ये सध्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, नागरिकांसाठी बॅडमिंटन मैदान, लहान मुलांसाठी रेल्वे व बोटिंग सुविधा, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी निवारा केंद्र, रोपवाटिका व नर्सरी इ. विविध सुविधा उपलब्ध असून उद्यानामध्ये जागेची मर्यादा आहे. त्यामुळे या ठिकाणी amusement zone उभारणी करणे अडचणीचे ठरणार असल्याचे नमूद केले आहे.

तसेच इतर योग्य उद्यानांमध्ये amusement zone विकसित करण्याबाबत विचार करता येईल, असेही अहवालात नमूद आहे.

सदर बाब विचारात घेता, याकरिता भगतसिंग उद्यानाची मागणी अर्जदाराने केली असली तरी त्याठिकाणी असणारी गर्दी जागेची उपलब्धता याचा विचार करता भगतसिंग उद्याना ऐवजी अन्य उद्यानात अशी व्यवस्था करणे योग्य वाटत असलेचे नमुद करुन मा. महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी वरील प्रमाणे amusement zone तयार करणे भगतसिंग उद्यान येथे प्रायोगिक तत्वावर मान्यता देणेत येत असुन भगतसिंग बागेमधील सध्या अस्तित्वात असलेल्या रेल्वे सुविधा उपलब्ध असणाऱ्या बंदिस्त जागेच्या मर्यादेत सदर amusement zone उभा करून नागरिकांना परवडेल अशा दरात महानगरपालिका बनवेल त्या नियमावलीस अनुसरून सदर पार्क उभा करणेस मान्यता देण्यात येत आहे भगतसिंग उद्यान येथील amusement zone चा प्रतिसाद विचारात घेऊन अन्य उद्यानामध्ये amusement zone उभारणेबाबत निर्णय घेणेत येईल.

सूचक : र. बा. रजपुते

अनुमोदक : R. A. Sat.. सौ. रु. अ. सातपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ४९
दि. ३०/०४/२०२६

ऐ. वे. विषय क्र. ०१ : अखिल भारतीय श्री. स्वामी समर्थ गुरुपीठ ( दिंडोरी प्रणीत ) श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक शाखा नदीवेस इचलकरंजी यास क वर्ग तिर्थ क्षेत्र दर्जा मिळणेबाबत अखिल भारतीय श्री. स्वामी समर्थ गुरुपीठ (दिंडोरी प्रणीत) श्रीक्षेत्र त्रंबकेश्वर, जिल्हा नाशिक शाखा नदीवेस इचलकरंजी यांनी दि. २३/०९/२०२५ चे अर्जानुसार मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ (दिंडोरी प्रणीत) श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि,नाशिक शाखा- नदिवेस इचलकरंजी यास क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळणेबाबत यास क वर्ग तिर्थ क्षेत्र दर्जा मिळणेबाबत अखिल भारतीय श्री. स्वामी समर्थ गुरुपीठ (दिंडोरी प्रणीत) श्रीक्षेत्र त्रंबकेश्वर, जिल्हा नाशिक शाखा नदीवेस इचलकरंजी यांनी दि. २३/०९/२०२५ चे अर्जानुसार मागणी केलेली आहे.

सदर अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या न्यासाचे मुळ उद्देश खालीलप्रमाणे असलेचे नमुद केले आहे.

१. राष्ट्रीय एकात्मता, माता बाल संगोपन, नितिमुल्यावर आधारित बालसंस्कार.
२. मानव संसाधन विकास, व्यक्तितत्व विकास, महिलांचे सक्षमिकरण.
३. बेरोजगार युवक/युवतींना उद्योग/व्यवसाय/नोकरी संदर्भात मागदर्शक शिबिरे.
४. आयुर्वेदाचे प्रचार/प्रसार,ध्यानधारना, मन:शांती शिबिरद्वारे सकारात्मक दृष्टीकोन वृध्दिंगत करणे.
५. विना हुंडाने विवाह संस्कार आयोजित करणे. कौटुंबिक सौहार्द वृध्दिंगत करणे.
६. रक्तदान शिबिरे, आरोग्य निदान शिबिरे आयोजित करणे वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, वनविकास कार्यक्रम राबविणे.
७. पशुधन विकास कार्यक्रम राबविणे, मराठी संस्कृतीदर्शक शिबिरे आयोजित करणे.
८. राष्ट्र मातेची सेवा, राष्ट्रीय सण साजरे करुन प्रात्याक्षित द्वारे कार्यक्रम राबविणे.
९. कृषी विज्ञान प्रदर्शन आयोजित करणे.
१०. बागायती शेती, वनशेती, कोरडवाहु शेती, सेंद्रीय शेती व शेतमाल प्रक्रियेवर आधारित उद्योग उभारणी या बाबत शेतक- यांना मागदर्शन करणे.
११. पर्जन्याद्वारे थेंब ना थेंब अडवुन शेततळे बांधारे यात पाणी साठविणे या बाबत मागदर्शन करणे.
१२. सौरउर्जा, पवन उर्जा या सारख्या नैसर्गिक सामग्री अपारंपारिक वीजनिर्मिती बाबत प्रात्यक्षित रुपाने मागदर्शन करणे.
१३. तसेच याप्रमाणे या केंद्राची खालील प्रमाणे उदिष्ट असलेचे ही नमुद केले आहे.
१४. केंद्रात येणारे दररोज सेवेकारी संख्या - ७००
१५. केंद्रात येणारे प्रत्येक गुरुवारी येणारे सेवेकरी - २,०००
१६. केंद्रात होणारे मोठे उत्सव म्हणजेच पारायण सप्ताह व इतर कार्यक्रम - १,५००
१७. केंद्रात महाप्रसादासाठी उपस्थिती - १५,०००/-

याकरीता केंद्राला स्वामी समर्थ महाराजांचा दरबार व खालचा मजला बेसमेंट पार्कीग, बालसंस्कार व योगाभवन ची आवश्यकता सेवेकरांची संख्या भरपुर असलेने त्याच्यासाठी शौचालय व बाथरुम याची आवश्यकता व चार चाकी गाडी व दु-चाकी गाडी यांची पार्किग व्यवस्था गुरुचरित्र पारायणासाठी हॉल हे घटक आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.

अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ (दिंडोरी प्रणीत) श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि,नाशिक शाखा-नदिवेस इचलकरंजी यांचे मागणीनुसार अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ (दिंडोरी प्रणीत) श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि,नाशिक शाखा-नदिवेस इचलकरंजी यास क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळणेकामी परिपूर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकरी कार्यालय कोल्हापूर यांचेकडे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ (दिंडोरी प्रणीत) श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि,नाशिक शाखा- नदिवेस इचलकरंजी यास क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळणेसाठीचा सविस्तर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : [signature] र.सा.रजपुते

अनुमोदक : R.A.Sun.. सौ.रु.क्र.सातपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०१ ठराव क्र. ५०

सर्वसाधारण सभा दि. ३०/०४/२०२६

ऐ. वे. विषय क्र. ०२ : शहरातील मुख्य रस्त्यावरील काढलेल्या हातगाड्यां च्या जागी नो-फेरीवाला, व नो-व्हेईकल झोन करणे साठी ऐन वेळच्या विषय पत्रिकेत ठराव मंजूर करणे बाबत...

**ठराव**

शहरातील कोल्हापूर नाका पासून ते राजवाडा चौक या मुख्य रस्त्यावरील छोटे व्यापारी, फेरीवाले यांचे हात गाडे हटवण्यात आले असलेने व या सर्व फेरीवाल्यांचे पुनर्वसन इतरत्र करण्यात आलेले आहे. त्यामुळे मुख्य रस्त्याच्या कडेला जागा मोकळी करण्यात आली आहे.

परंतु भविष्यात सदर मोकळ्या जागेवर नवीन फेरीवाले हातगाडे इतर चार चाकी व मालवाहतूक गाड्या लावण्याचा प्रयत्न करू नयेत यासाठी सदर मोकळ्या जागी व फुटपाथच्या ठिकाणी नो-फेरीवाला व नो-व्हेईकल झोन जाहीर करून याठिकाणी तसा बोर्ड लावण्यासाठी दिनांक ३० एप्रिल २०२६ च्या महासभेत ठराव करुन घेणेबाबत कोल्हापूर जिल्हा छोटे व्यापारी, फेरीवाले संघटना, इचलकरंजी यांनी मागणी केली आहे.

तरी इचलकरंजी शहरातील कोल्हापुर नाका ते राजवाडा चौक हा मुख्य रस्ता अतिक्रमण मुक्त करणेत आलेला आहे. सदर रस्त्यावरील अतिक्रमण काढणेत आले असलेने मोकळ्या झालेल्या ठिकाणी भविष्यात इतर कोणतेही अतिक्रमण होऊ नये व सदर ठिकाणी फेरीवाले, हातगाडे, चार चाकी गाडया व मालवाहतुक गाडया लावणेस मनाई करणेत येत असुन सदरचा संपुर्ण रस्ता हा नो-फेरीवाला झोन करणेबाबत चा प्रस्ताव महानगरपालिका फेरीवाला समितीकडे सादर करणेत यावा व शहर वाहतुक शाखेमार्फत शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढलेल्या जागी नो-व्हेईकल झोन करणेत यावा व नो-व्हेईकल झोन येथे वाहने लावल्यास सदर वाहनांवर शहर वाहतुक शाखेमार्फत कारवाई करणेत यावी.

सूचक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

अनुमोदक : Satish स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner